# बृहन्महाराष्ट्र वृत्त

वर्ष ४५
अंक ३

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

**समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक**

मार्च २०२५
फाल्गुन शके १९४६
चैत्र शके १९४७


नमस्कार मंडळी,

मार्च महिना म्हटले की थंडी कमी होत जाणार आणि वसंत ऋतूचे आगमन होणार या कल्पनेनेच प्रसन्न वाटते. झाडांना पालवी फुटून जेव्हा नवीन पाने उमलतात, तेव्हा बदलणाऱ्या रंगाछटा निश्चितच मोहक असतात. त्या पोपटी रंगाची सर्वदूर पसरणारी झालर कायम तशीच राहावी असे वाटते. सणासुदीचे म्हणाल तर ‘होळी-धुलीवंदन’ आणि त्या पाठोपाठ ‘गुढीपाडवा’. तुम्हा सर्वांना "मराठी नवीन वर्षाच्या शुभेच्छा", तसेच या महिन्यात येणाऱ्या "आंतरराष्ट्रीय महिला दिना" निमित्त सर्व महिला मंडळींना शुभेच्छा!

मराठी भाषेला “अभिजात दर्जा” मिळाल्यावर पहिल्यांदाच “मराठी भाषा गौरव दिन” नुकताच साजरा झाला. आपल्यापैकी बरीच मंडळे हा दिवस सार्वजनिकरित्या उत्साहाने साजरा करीत आहेत. मी गेल्या महिन्यात कोणती मंडळे “शिवजयंती, महाराष्ट्र दिन, आणि वारी साजरी करणार आहेत?” हा प्रश्न विचारला होता या प्रश्नाला खूपच चांगला प्रतिसाद मिळाला. आनंदाची गोष्ट म्हणजे यावर्षी १३ मंडळे ‘शिवजयंती’, १६ मंडळे ‘महाराष्ट्र दिन’, तर १३ मंडळे ‘वारी’ साजरी करत आहेत. ही संख्या लवकरात लवकर १००% व्हावी अशी माझी इच्छा आहे. ज्या उत्साहात आपण मंडळात ‘गणपती’ आणि ‘दिवाळी’ हे सण साजरे करतो, त्याच उत्साहात हे पण "सण" आपण साजरे करायला हवेत. यातून नवीन पिढीला पण या सणांचे महत्त्व कळेल आणि आपली संस्कृती टिकवायची स्फूर्ती त्यांना मिळेल. यावर्षी ऑस्टिन, सॅन डियागो, आणि वॉशिंग्टन डीसी मंडळे हे तिन्ही सण साजरे करीत आहेत. ‘बोनस प्रश्न’ म्हणून "मराठी भाषा गौरव दिन किती मंडळे साजरा करणार आहेत?” हा प्रश्न विचारला होता. तर यावर्षी १० मंडळे हा दिवस साजरा करीत आहेत. ऑस्टिन आणि वॉशिंग्टन डीसी ही मंडळे हे चारही "सण" साजरे करीत आहेत. तर ओरलँडो, ब्लूमिंगटन, मराठी विश्व, सियाटल, आणि टोरांटो ही मंडळे चार पैकी तीन सण साजरे करीत आहेत - या सर्व मंडळांचे हार्दिक अभिनंदन!!! या महिन्यात छत्रपती श्री शिवाजी महाराजांची तिथीने जयंती आहे तरी, ज्या मंडळांनी गेल्या महिन्यात शिवजयंती साजरी केली नसेल त्यांना परत एक संधी आहे.

गेल्या महिन्यात बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे "शिवचरित्र पारायण सोहळा" उत्साहात पार पडला. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे शाळा संचालक राहुल देशमुख यांच्या पुढाकाराने गेली तीन वर्षे हा सोहळा उत्साहात पार पडत आहे. यावर्षी २० दिवसात ३८ मान्यवरांनी "शिवकथा" वाचन केले. हा उपक्रम यशस्वीरित्या पार पाडणाऱ्या सर्व स्वयंसेवकांचे, वाचकांचे, आणि श्रोते मंडळींचे हार्दिक अभिनंदन!

त्याच बरोबर "मराठी भाषा गौरव दिना" चा मुहूर्त साधून मराठी शाळेचे संचालक राहुल देशमुख यांच्या पुढाकाराने शक्य झालेल्या "मराठी शाळा गीता" चे आपण प्रकाशन केले. अनेक दिवस चाललेल्या या प्रकल्पात अनेक बालकलाकारांनी, तसेच हौशी गायकांनी भाग घेऊन गाण्याची गोडी वाढवली आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सर्व शाळा एक दिवस मंडळाच्या कार्यक्रमात हे गाणे सादर करतील अशी मी अपेक्षा करतो.



आता विश्व मराठी संमेलनाबद्दल: हे संमेलन ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारीला पुणे येथे संपन्न झाले. जगभरातून अनेक मान्यवर या संमेलनाला उपस्थित होते. बृहन्महाराष्ट्र मंडळाला सुद्धा महाराष्ट्र शासनाकडून आमंत्रण आले होते. बृहन्महाराष्ट्र मंडळाकडून १५ ते २० जणांनी उपस्थिती नोंदवली. या सर्व मंडळींशी तिकडे संवाद साधताना मजा आली. उद्घाटन सोहळ्याला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे तसेच श्री. अजितदादा पवार, आणि मराठी भाषा तसेच उद्योग मंत्री श्री. उदयजी सामंत, आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. या सर्वांबरोबर तुम्हा सर्वांच्या वतीने व्यासपीठावर बसण्याचा मान मला मिळाला याबद्दल तुम्हा सर्वांचा मी शतशः आभारी आहे.

संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी मराठी भाषा तसेच उद्योग मंत्री श्री. उदयजी सामंत यांच्याकडून बृहन्महाराष्ट्र मंडळातील उपस्थित समिती सदस्यांचा - मी (अध्यक्ष), संतोष साळवी (खजिनदार, तसेच न्यू हॅम्पशायर चे नवनिर्वाचित आमदार), आणि राहुल देशमुख (शाळा संचालक) - सत्कार करण्यात आला.

संमेलनाच्या तिसऱ्या आणि शेवटच्या दिवशी बृहन्महाराष्ट्र मंडळाची माहिती देण्याचा कार्यक्रम होता. यात बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या समितीकडून मी (सर्वसाधारण माहिती), संतोष साळवी (बी-कनेक्ट), राहुल देशमुख (मराठी शाळा, युवा, आणि पॉडकास्ट), मेधा गोडबोले (उत्तररंग आणि रेशीमगाठी), तसेच स्वयंसेवक म्हणून निवी पानवळकर (मराठी शाळेचा बालक-पालक), विद्या हर्डीकर सप्रे (समाजरंग) यांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. अत्यंत कमी वेळात आणि अत्यंत सुंदर रीतीने हे संमेलन आयोजन करणाऱ्या महाराष्ट्र शासनाचे, तसेच सर्व माननीय मंत्री महोदयांचे, आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन!

आनंदाची गोष्ट म्हणजे गेल्या महिन्यात "लास वेगस" आणि "कोलंबस गणेश मंडळ, इंडियाना", या दोन मंडळांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाचे सभासदस्यत्व घेतले - या दोन्ही मंडळातील सर्व सभासदांचे आम्ही ‘बृहन्महाराष्ट्र मंडळ परिवारात’ स्वागत करतो.

जय हिंद - जय महाराष्ट्र!

आपला,

**- प्रसाद पानवळकर** अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**
बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर
अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
**BMM Treasurer - Santosh Salvi**
**4 Azalea Lane, Nashua, NH 03062**
**Ph: 603 438 9279**
**Email: santosh.salvi@bmmonline.org**

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75
**Send your payments to: zelle@bmmonline.org**

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)**
**मताधिकार असलेले सदस्य**
अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस
सचिव: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
कोषाध्यक्ष: संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर
सदस्य: पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया
मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो
गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा
राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी
**नियुक्त सदस्य**
माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो
**विश्वस्त समिती**
अध्यक्ष : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

## या अंकात

| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती | २ |
| २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल | ३ |
| मराठी विश्व संमेलन | ४ |
| बृहन्महाराष्ट्र मंडळ : समाजरंग | ४ |
| जाहिरात | ५ |
| BMM Texas मैत्री मेळावा 2025 | ६ |
| आंतरराष्ट्रीय मराठी मंच आढावा | ७ |
| Women's Month Interview | ८ |
| YUWA | १० |
| कविता: होळी | ११ |
| जाता ट्युलिप फुलांच्या नंदनवनात | ११ |
| आपणच आपले जेलर | १२ |
| 'पाय डे" स्पर्धा | १५ |
| श्री शैलगमन उत्सव | १६ |
| विश्व मराठी संमेलन २०२५ - क्षणचित्रे | १७ |
| विश्व मराठी संमेलन २०२५ - एक अनोखा अनुभव | १८ |
| रेघ.... | १९ |
| अक्षरे | २० |
| रंगांची दुनिया | २१ |
| MANA Paintings | २२ |

## संपादक समिती

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
प्रसाद पानवळकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :
Email - Vrutta@Bmmonline.org
आलेल्या प्रतिक्रियां पैकी, निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. शब्दमर्यादा: १०० शब्द.

## २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल

'बीएमएम वृत्त'च्या सर्व वाचकांना थंडीने गारठलेल्या सिॲटल शहराच्या परिसरातून नमस्कार! नुकतीच पहिली हिमवृष्टी झाल्याने आमचं सुंदर शहर आता अधिकच सुंदर दिसत आहे आणि वाढत्या थंडी बरोबर आमच्या स्नेहसंमेलनाच्या तयारीच्या वेगातही वाढ झाली आहे!

सिॲटल महाराष्ट्र मंडळाच्या संक्रांतीच्या कार्यक्रमात आम्ही देणगीदार आणि प्रायोजकांसाठीच्या पॅकेजेसची घोषणा केली. आम्हांला ह्या पॅकेजेस संदर्भात अनेक जणांनी संपर्क साधला. फक्त सिॲटलच नाही तर अमेरिकेच्या विविध शहरांमधून देणगीदार पुढे येत आहेत. आत्तापर्यंत सिॲटल, डॅलस, क्लिवलँड, शिकागो, सॅन होजे ह्या शहरांमधून आलेल्या देणगीचा निधी जमा झाला आहे. ह्याशिवाय टोरॉंटोमधल्या पहिल्या देणगीसह कॅनडानेही खातं उघडलं आहे. सांगायला अतिशय आनंद होतो आहे की ह्या सर्व देणगीदारांच्या सहकार्यामुळे स्नेहसंमेलनाच्या खात्याने एका महिन्याच्या आत सत्तर हजार डॉलरचा टप्पा ओलांडला आहे! बाकी शहरांमधल्या देणगीदारांनी आणि प्रायोजकांनीही खातं उघडण्याची आम्ही वाट बघत आहोत. पॅकेज बद्दलची सर्व माहिती स्नेहहसंमेलनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

bmmseattle2026.org/individual-donor-sponsorship-tiers/. सर्व इच्छुक देणगीदारांना विनंती आहे की त्यांनी आमच्याशी donations@bmmseattle2026.org ह्या इमेल पत्त्यावर संपर्क साधावा. आम्ही तुमच्याबरोबर चर्चा करून तुम्हांला योग्य असे कॉर्पोरेट किंवा वैयक्तिक पॅकेज निवडायला मदत करू.

निधी संकलनाबरोबरच स्नेहसंमेलनासाठी भारतातून दर्जेदार कार्यक्रम आणण्यासाठी कार्यक्रम समितीचे कामही गेले २ महिने जोरात सुरु आहे. भारतातील नामांकित कलाकारांच्या भेटी घेऊन त्यांचे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी समितीचे सदस्य उत्साहात प्रयत्नरत आहेत. आम्हाला सर्व कलाकारांकडून खूप छान प्रतिसाद मिळतो आहे आणि बीएमएमच्या मंचावर कार्यक्रम सादर करण्यासाठी कलाकारही उत्सुक आहेत. संमेलन स्थळाला भेट देऊन विविध सभागृहांची पहाणी करणे, कार्यक्रमांच्या स्वरूपानुसार अनुकूल सभागृह निवडणे, कार्यक्रम पार पाडण्यासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टींचा विचार करून आराखडा तयार करणे, खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे अशा कामांमध्ये कार्यक्रम समिती सध्या व्यग्र आहे.

भारतातून येणाऱ्या कलाकारांबरोबरच उत्तर अमेरिकेतल्या गुणी कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करण्यासाठीही आम्ही अतिशय उत्सुक आहोत. मराठी माणूस कुठेही गेला तरी त्याचं नाटकवेड जोपासत असतो. नाट्यकला ही बहुअंगी, बहुपेडी अभिव्यक्ती आहे. लेखन, दिग्दर्शन, अभिनय, नेपथ्य, प्रकाश, ध्वनी इ. अनेक सृजनशील उर्मींना साकार करणारी! एकांकिका हा त्यातला एक आव्हानात्मक आविष्कार असतो. प्रेक्षकांपर्यंत उत्तम कलाकृती पोहोचवायची पण मर्यादित चौकटीत बसवून. हे आव्हान पेलू शकणारी अनेक गुणवंत, कलावंत मंडळी आपल्या इथे आहेत. खास त्यांच्यासाठी आणि नाट्यरसिकांसाठी आम्ही नाट्यसृजन ही एकांकिका स्पर्धा आयोजित करणार आहोत. ह्याशिवाय अनेक कलाप्रकारांच्या स्पर्धा आणि उपक्रमही स्नेहसंमेलनात आपल्याला बघायला मिळतील. ह्या सर्व स्पर्धांचे नियम व अटी, प्रवेशिकांची नोंदणी आणि तुम्ही सादर करू इच्छिणाऱ्या कार्यक्रमांच्या प्रस्तावाची नोंदणी, ह्या संबंधीची घोषणा आम्ही गुढी पाडवा आणि त्या बरोबरीने येणाऱ्या वसंत ऋतूत करू!

विविध कलाकारांच्या वैविध्यपूर्ण कार्यक्रमांनी आणि सादरीकरणांनी एका अविस्मरणीय स्नेहसंमेलनाचा अनुभव आपल्या सर्वांना मिळेल ह्याची आम्हाला खात्री आहे.

आपल्या स्नेहसंमेलनाचे स्थळ म्हणजे 'सिॲटल कन्व्हेन्शन सेंटर' तसेच बाकी समित्यांच्या कामाबद्दलची माहिती आम्ही आपल्याला पुढच्या वृत्तपत्रांद्वारे देत राहू. स्नेहसंमेलनाशी संबंधित बातम्या आणि घडामोडी समाजमाध्यमांतून बघत रहा ..
फेसबूक: facebook.com/bmm2026seattle ;
इंस्टाग्राम: instagram.com/bmm2026seattle/# तसेच आपल्या सूचना, अभिप्राय आणि प्रश्नांसाठी info@bmmseattle2026.org ह्या इमेल पत्त्यावर संपर्क साधा.

**राशिभविष्य : मार्च २०२५**
**"या महिन्यात दोन ग्रहण आणि दोन ग्रहांचे राशी बदल होणार आणि आपल्या जीवनात मोठे बदल येणार. "**
**अजय तनखीवाले**
https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## मराठी विश्व संमेलन

जानेवारी २०२५ मध्ये पुण्यात होणाऱ्या 'मराठी विश्व संमेलना' चे निमंत्रण मला बीएमएमकडून मिळाले, तेव्हा शिक्षणमंत्री श्री. केसरकर यांनी आयोजित केलेल्या वाशीतील गेल्या संमेलनाच्या आठवणी ताज्या झाल्या. त्याच मोठ्या अपेक्षेने मी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधील कार्यक्रमाला उपस्थित राहिलो आणि मी निराश झालो नाही. आयोजक आणि स्वयंसेवकांनी कार्यक्रमस्थळाची सुरेख सजावट केली होती आणि नोंदणीपासून करमणूक / मनोरंजन आणि जेवणापर्यंत प्रत्येक गोष्टीचे काटेकोर नियोजन करण्यात आले होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत आणि त्यांच्या प्रभावी भाषणांमुळे उद्घाटनाला एका नव्या उंचीवर नेऊन ठेवले. उद्घाटनाच्या वेळी आमचे बीएमएम अध्यक्ष प्रसाद पानवळकर यांना व्यासपीठावर पाहणे देखील आनंददायक होते. नवनिर्वाचित राज्य प्रतिनिधी म्हणून सर्व मान्यवरांसमवेत व्यासपीठावर निमंत्रित होण्याचा मान मला मिळाला आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी अमेरिकेचे नवनिर्वाचित आमदार म्हणून माझ्या यशाची दखल घेतली. उद्घाटनानंतर लगेचच एकनाथ शिंदे यांच्याशी बोलण्याची संधी मिळाली.



सलग दुसऱ्या वर्षी या संमेलनात सहभागी झालेल्या जगभरातील व्यावसायिकांनी महाराष्ट्रीयन म्हणून आपला अभिमान साजरा करण्यासाठी आणि सांस्कृतिक आणि व्यावसायिक देवाणघेवाणीच्या माध्यमातून आपल्या सहकारी मराठी बांधवाना पाठिंबा देण्यावर चर्चा करण्यासाठी एकत्र आल्याचे पाहून मन प्रसन्न झाले. मनोरंजनाचे बहुतेक कार्यक्रम मी मनसोक्त एन्जॉय केले, पण कोकणातील तरुण कलाकारांना विविध प्रादेशिक नृत्ये सादर करताना पाहणे हे माझ्यासाठी आकर्षण होते, ज्यामुळे गुहागरमधील माझ्या बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळाला.

एवढ्या मोठ्या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करणे सोपे काम नाही, म्हणून मी सर्व आयोजकांचे आणि स्वयंसेवकांचे त्यांच्या निर्दोष अंमलबजावणीबद्दल मनःपूर्वक अभिनंदन करतो. भविष्यातील संमेलनांसाठी मी महाराष्ट्रातील उत्पादने आणि सेवा जागतिक बाजारपेठेत प्रदर्शित करण्यासाठी व्यावसायिकांसाठी लहान सेमिनार किंवा मेळावे आयोजित करण्याची सूचना करू इच्छितो. यामुळे समविचारी व्यक्तींना भारत आणि इतर देशांमध्ये योगदान देऊ शकतील असे गट तयार करण्यास प्रोत्साहन मिळू शकते. असे केल्याने आपण आपली संस्कृती समृद्ध करू शकतो आणि अशा घटनांना जागतिक स्तरावर नेण्यासाठी भक्कम आर्थिक पाया उभा करू शकतो.

- **संतोष साळवी**, नाशुवा, न्यू हॅम्पशायर

## बृहन्महाराष्ट्र मंडळ : समाजरंग

**“हात देऊ मदतीचे | सेतू बांधू अंतरीचे ||**
**जुळवू नाते मनांचे | स्वप्न पाहू सुपंथाचे||”**

समाजरंग या उपक्रमाबद्दल सविस्तर माहिती डिसेंबरच्या अंकात दिली आहे. प्रत्येक मराठी मंडळाने वर्षभरात काही ना काही निधी विशेषतः: महाराष्ट्रातील सामाजिक उपक्रमांना द्यावा हे सूत्र आहे. त्यासाठी कामाची निवड करण्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळ मदत करेल.

या महिन्यात ईस्ट फ्लोरिडा मराठी मंडळाने महाराष्ट्रातील सामाजिक कामासाठी योगदान करण्याचा मनसुबा जाहीर केला. एक ‘चॅरिटी वॉक’ करून जमलेले पैसे ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन च्या प्रकल्पास दिले जातील. हा कार्यक्रम एप्रिलच्या पहिल्या दुसऱ्या आठवड्यात होईल.

समाजरंग या संकल्पनेचे इंग्रजीत रूपांतर करायचे तर आपल्याला ‘social initiative’ असा शब्द वापरता येईल.

**Meeting of the minds | Dream one of a kind | Helping hands of all kinds | Bridging miles and minds ||**

- **विद्या हर्डीकर सप्रे**, टेक्सस



ईशान्य ओहायो मराठी मंडळ
Marathi Mandal of North East Ohio
सुवर्णमहोत्सव
BMM मेळावा २०२५

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ

# 3 days of Marathi Extravaganza

# BMM2025 & NEOMM

Co-hosts: Pittsburgh, Columbus, Cincinnati, Buffalo, Detroit

## Golden Jubilee Celebration!

## June 13, 14 & 15

Only $250

Drama, Classical, Rock, Poetry, Food, Friends & Fun!






## Severance Hall, Cleveland, Ohio



**50 years ago, in 1975, a handful of Marathi families living in the area at that time came together and founded Northeast Ohio Marathi Mandal (NEOMM) - a non-profit 501c(3) - to celebrate the rich and ancient Marathi culture in the Northeast Ohio region. NEOMM is a proud member of Bruhan Maharashtra Mandal (BMM) - the national body of all Marathi organizations in the USA and Canada. BMM has awarded the rights to host its prestigious 2025 Maitree-Melawa event (regional convention) to NEOMM!**

**It's my great pleasure to invite you to this auspicious occasion! - Tanmayee Dixit, Covener**

**Hightlights**

Star-studdeed lineup straight from Maharashtra!

Shaan - first time ever with Marathi-Hindi songs, Prashant Damle, Mahesh Kale, Sankarshan Karhade, Nihira Joshi, Salil Kulkarni, Shaunak Abhisheki, Shubhankar Kulkarni and more!

Yayati and Devayani by popular demand!

The Best of North America Talent show!

Friends and family sit together

1 adult (18+) ticket includes 1 free child ticket

Priority access to nearest hotels | Negotiated hotel rates

3 meals, 2 breakfasts, tea/coffee snack stations

Prestigious banquet dinner with artists, sponsors and donors (available for purchase)

**Contact: Prasad Panwalker, BMM President (512) 294-3229, Dr. Medha Godbole, BMM EC (440) 241-3167 or your Local Mandal President**

## BMM Texas मैत्री मेळावा 2025




नमस्कार! बृहन्महाराष्ट्र मंडळाचा प्रादेशिक मैत्री मेळावा यंदा डॅलसला होतो आहे. **१९ आणि २० एप्रिलला** होणाऱ्या या मैत्री मेळाव्यातील विविध कार्यक्रमांची जोरदार तयारी सुरू झाली आहे. यजमान डॅलस फोर्ट वर्थ महाराष्ट्र मंडळाबरोबरच टेक्सासमधील ह्युस्टन, ऑस्टीन आणि सॅन अँटोनियो महाराष्ट्र मंडळ आणि तेथील सभासदही ह्या मेळाव्यात उत्साहाने सहभागी होत आहेत.

२६ जानेवारीला भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून "वंदे भारत" ही सवलत योजना जाहीर करून या मेळाव्याची तिकीटविक्री सुरु झाली तर १४ ते २८ फेब्रुवारी मैत्री विशेष सवलत योजना सुरु आहे. पहिल्या तीन आठवड्यातच १००० हून अधिक तिकिटांची विक्री झाली असून या योजनेला भरभरून प्रतिसाद मिळतो आहे. हा मैत्री मेळावा असल्याने केवळ टेक्सासमधूनच नव्हे, तर संपूर्ण उत्तर अमेरिकेतून आपल्या मराठी समुदायाने यात सहभागी व्हावे आणि परस्पर मैत्री वृद्धिंगत करावी असं विचार ह्या मेळाव्याचे आयोजन करताना केला आहे. त्यामुळे उत्तर अमेरिकेतील सर्व मराठी बांधवांना डॅलस फोर्ट वर्थ महाराष्ट्र मंडळातर्फे या मेळाव्याला येण्यासाठी हे आग्रहाचे आमंत्रण.

तिकिटांबरोबरच, सर्व सभासदांसाठी आयोजकांनी विविध Donation Packages उपलब्ध करून दिलेले आहेत. या Donation Packages चा तुम्हाला तर फायदा आहेच पण त्याचबरोबर हा मैत्री मेळावा यशस्वी होण्यासाठी नक्कीच आर्थिक हातभार लागणार आहे. आयोजकांच्या मनातील 'बहारदार' मैत्री मेळावा प्रत्यक्षात साकार व्हावा यासाठी विविध Donation Packages चा जरूर लाभ घ्या. सोबत Donation Packages ची माहिती देत आहे.

मैत्री मेळावा तिकीट आणि Donation Packages साठी link - [www.dfwmm.org/melawa2025](www.dfwmm.org/melawa2025)

मैत्री मेळाव्यासाठी भारतातून येणाऱ्या खास कार्यक्रमांमध्ये **"जर तर ची गोष्ट" हे उमेश कामत आणि प्रिया बापट** यांचा अभिनय असलेले नाटक आणि **देवकी पंडित यांचा "स्वरांजली"** हा सदाबहार गायनाचा कार्यक्रम यांवर शिक्कमोर्तब झाले आहे. **"राजा शिवछत्रपती"** हे शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित भव्य महानाट्य DFWMM चे सभासद सादर करणार आहेत. त्याची तयारी जोरदार सुरू झाली आहे. १२५ हून अधिक कलाकारांच्या या कलाविष्काराने मेळाव्याची सुरुवात होईल. मैत्रीचा धागा पकडून याच विषयावर आधारित नव्या कोऱ्या दृकश्राव्य नाट्याने या मैत्री मेळाव्याची सांगता होईल.

स्थानिक कलाकारांच्या गुणवत्तेच्या उंचीबाबत आयोजकांना कायमच खूप विश्वास वाटत आला आहे. त्यामुळे त्यांच्यातील talent expression साठी काय "हटके" आणि challenging करता येईल यावर बरेच विचार मंथन झाले. त्यातून ३ प्रकारच्या कार्यक्रमांची निवड करण्यात आली. डॅलस, ऑस्टिन, ह्युस्टन आणि सॅन अँटोनियोच्या स्थानिक कलाकारांना या ३ पैकी कोणत्याही एका कार्यक्रमात सहभागी होता येईल. नृत्यकथा ज्यात कलाकारांना नृत्य सादर करायचे आहे पण त्याच बरोबर ते कथेतपण गुंफले जाईल अशी काळजी घ्यायची आहे. दुसरा कार्यक्रम आहे लघुनाट्य - यात तुमचे लघुनाट्य हे आनंदी अथवा विनोदी theme वर आधारित असावे ही अपेक्षा आहे. तर Bollywood Jeopardy या Game Style event मधल्या टीम्सना अंताक्षरी बरोबरच bollywood वर आधारित काही खुमासदार प्रश्न विचारले जातील. अतिशय रंजक असा हा कार्यक्रम नक्कीच सर्वांना आवडेल.

ह्या सगळ्या कार्यक्रमात आपली युवा पिढी सहभागी झाली तर त्याचा आनंद आणि समाधान वेगळेच असते. याच विचाराने मुलांसाठीच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी आम्ही त्या वयोगटातील मुलांनाच प्रोत्साहित केले आहे. ही मुले देखील उत्साहाने त्यांच्यासाठी आणि त्यांच्या वयोगटातील इतर मुलांसाठी कार्यक्रमांची आखणी करत आहेत. मुलांनी मुलांसाठी केलेला युवा कार्यक्रम हे या मेळाव्याचे आकर्षण आहे. यातून नवीन पिढी आपल्या संस्कृतीशी जोडली जाते हेच ह्या मेळाव्याचे मुख्य फलित आहे.

या कार्यक्रमांबरोबरच बृहन्महाराष्ट्र मंडळाचे काही प्रकल्पही या मेळाव्यात समाविष्ट आहेत. **उत्तररंग** हा खास ज्येष्ठांचा सहभाग असलेला कार्यक्रम आपण आयोजित करत आहोत. वेगवेगळ्या पद्धतीने ज्येष्ठांना कसे सहभागी करून घेता येईल यावर आपला कायमच भर असतो. ते लक्षात ठेवूनच उत्तररंग या खास ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या कार्यक्रमाचे विचारपूर्वक नियोजन झाले आहे. टेक्सास मध्ये विविध उद्योगात आपली मराठी community अग्रेसर आहे. नवीन उद्योजक तसेच नवीन उद्योग सुरू करण्यास इच्छुक असणाऱ्यांसाठी **BConnect** कार्यक्रम नक्कीच फायदेशीर ठरेल. यांत प्रत्येक उद्योजकाला आपला उद्यम सर्वांसमोर मांडण्याची संधी मिळणार आहे. टेक्सास मधील यशस्वी उद्योजकांशी संवाद साधून त्यांच्या अनुभवाचा बाकीच्यांना फायदा व्हावा असा यामागे हेतू आहे. टेक्सास मधील डॉक्टर्स आणि संबंधित सेवा ह्यांना एकत्र आणून त्याचा मराठी बांधवांना उपयोग करून घ्यावा तसेच अनुभवी डॉक्टर्स आणि नव्या पिढीतील डॉक्टर्स यांना एकत्र आणून त्यांचाही एकमेकांना उपयोग व्हावा या उद्देशाने **Physician Networking** हा कार्यक्रम आयोजित केला आहे. आत्तापर्यंत 30-40 डॉक्टरांनी आपला प्रतिसाद नोंदवला आहे. **Real estate** आणि त्यासंबंधी लागणाऱ्या सेवा यांना एकत्र आणून त्यातून त्यांना व इतरांना फायदा व्हावा असे **Real Estate Conference** आयोजित करण्यामागे उद्दिष्ट आहे.

या मेळाव्यासाठी वर सांगितल्याप्रमाणे देणगीचे पर्याय उपलब्ध आहेतच, त्याचबरोबर आपल्या व्यवसायाची जाहिरात १६०० ते १८०० उपस्थितांसमोर करण्याची संधीही उत्तर अमेरिकेतील व्यवसायांना आहे. त्यासाठी खास प्रायोजकत्वाचे पर्याय इथे देत आहोत.

एप्रिलमध्ये होणाऱ्या या मेळाव्याविषयी तयारी आणि अधिक माहिती पुढील वृत्तात तुमच्यापर्यंत पोहोचवूच, पण सर्व आयोजकांतर्फे हे सस्नेह आमंत्रण आपण स्वीकारावे आणि या मेळाव्याला उपस्थिती नोंदवून आपली मैत्री वृद्धिंगत करावी ही विनंती.

- **शामली असनारे,** अध्यक्ष, डॅलस फोर्ट वर्थ महाराष्ट्र मंडळ

## आंतरराष्ट्रीय मराठी मंच आढावा




पुण्यात फर्ग्युसन कॉलेजमध्ये नुकतेच विश्व मराठी संमेलन पार पडले. या संमेलनाला आंतरराष्ट्रीय मराठी मंचाची समन्वयक म्हणून जाण्याचा योग आला. त्यानिमित्ताने वृत्ताच्या वाचकांना 'आंतरराष्ट्रीय मराठी मंच' ची ओळख करून देण्यासाठी हा लेखनप्रपंच.

आंतरराष्ट्रीय मराठी मंचाची स्थापना २०२२ साली करण्यात आली. हा मंच परदेशात मराठी भाषेचा प्रचार-प्रसार तसेच जतन आणि संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था आणि महाराष्ट्र शासन यातील दुव्याचं काम करतो.

ज्ञानेश्वर मुळे हे या मंचाचे मुख्य समन्वयक असून जगभरातील विविध १७ देशात उपसमन्वयक आहेत. यात उत्तर अमेरिकेसाठी अभिषेक सूर्यवंशी आणि मी म्हणजे निवेदिता पानवळकर असे दोघे आहोत. मराठी भाषेबद्दल जागरूकता आणि रुची निर्माण करणं, आणि मराठीचा प्रसार करणं हे या मंचाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्या दृष्टीने गेली तीन वर्षे मराठीचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी मंचातर्फे अनेक नवीन उपक्रम राबवण्यात आले. जगभरातील मराठी माणसांना समाविष्ट करण्याच्या दृष्टीने मंचाने काही नवे उपक्रम सुरु केले आहेत. यामध्ये जगभरातील विद्यापीठांमध्ये 'मराठी लँग्वेज कॅफे' सुरू करण्याचे उद्दिष्ट आहे. युनायटेड किंग्डम मधल्या विद्यापीठांमध्ये सुरु केलेल्या मराठी लँग्वेज कॅफेला भरघोस प्रतिसाद मिळाला. त्या अनुषंगाने जगातल्या इतर विद्यापीठांमध्ये मराठी लँग्वेज कॅफे सुरु करण्याचा मंचाचा संकल्प आहे. मराठी उद्योजकांना व्यवसाय सुरु करण्यासाठी, सुरु केलेले व्यवसाय वाढवण्यासाठी आणि लागेल त्या प्रत्येक टप्प्यावर मदत करण्याचा मंचाचा मानस आहे. त्यासाठी मंच त्या त्या भागातील स्थानिक सुस्थापित संस्थांशी समन्वय साधून म्हणजे उत्तर अमेरिकेत बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मदतीने मराठी उद्योजकांना मदत करू शकेल.
बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मराठी शाळांमध्ये शेकडो विद्यार्थी मराठी शिकत आहेत. या विद्यार्थ्यांसाठी मराठी निबंध स्पर्धा, कथाकथन, वक्तृत्व स्पर्धा घेऊन गुणी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाकडून

प्रशस्तिपत्रके देण्याचा मंचाचा मानस आहे. याशिवाय वेलिंग्टन, न्यूझीलंड मध्ये मराठी शाळा सुरु करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

आता लवकरच युरोप, ऑस्ट्रेलिया आणि युनायटेड किंग्डममध्ये मराठी संमेलने होणार आहेत. त्याशिवाय उत्तर अमेरिकेत क्लिव्हलँड आणि डॅलस येथे स्थानिक संमेलने होणार आहेत. तसेच २०२६ मध्ये अमेरिकेत बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन आहे. जगभरातील आंतरराष्ट्रीय मराठी मंचाचे समन्वयक एकमेकांच्या संमेलनांना उपस्थित राहून ठिकठिकाणच्या चांगल्या गोष्टी शिकण्यासाठी सहभाग घेतील.

अमराठी भाषिकांना मराठी पोचवण्यासाठी काही उपक्रम सुरु करण्याचीदेखील मंचाचा संकल्प आहे. याशिवाय ऑनलाईन मराठी साहित्य संमेलन करण्याचा मंचाचा मानस आहे जेणेकरून सर्व वयोगटातील नवशिक्या, प्रस्थापित साहित्यिकांना सहभागी होता येईल. याशिवाय जागतिक पातळीवर मराठी भाषा शिकवण्याचे मॉडेल तयार करणे, तंत्रज्ञानाचा आणि विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून जगभरात पोचवण्यासाठी चॅटबॉट तयार करणे, मराठी इतिहास, संस्कृती, आणि परंपरांवर आधारित स्पर्धा आयोजित करणे असे अनेक उपक्रम मंचाच्या विचाराधीन आहेत.

अधिक माहितीसाठी ई-मेल: panvalkar@yahoo.com

- **निवी पानवळकर,** ऑस्टिन, टेक्सस

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## Women's Month Interview



I am truly honored and excited to be part of this conversation, especially during Women's Month. It is such a special time to reflect on the achievements and contributions of women across all fields. As a female classical musician, my journey is ongoing. Every step of my journey brings new lessons, and I am eager to see where this path leads!

- **What age did you start learning music? And at what age did you realize that you had a passion for it? Was there any significant event or moment that made you realize it?**

I honestly don't remember a time when I wasn't surrounded by music, so I can't really point out an age! Both my parents are music teachers, and my mom is a trained Hindustani classical singer with a master's degree in it. Growing up, music was always in the air—whether it was my mom singing, my dad playing peti (harmonium), or artists from India visiting. I started to appreciate music at a young age, and it just became a natural part of my life. Because of that, I don't think there was ever a specific moment when I realized I loved singing. It was more like singing was always on my mind, and I just went with it!

However, there were a few moments that really defined my growing interest in music, and two major ones were hearing my gurus, Pt. Vijay Koparkar and Pandita Dr. Veena Sahasrabuddhe, for the first time. What struck me most was the incredible amount of time, thought, and energy they had invested in their crafts. Both have such unique and distinct singing styles, and hearing them live showed me just how much is possible within music. Whether it was their mastery of taal and sargam, their interpretation of raag and khyaal, or the way they brought life to tarana, tappa, thumri, and bhajan—it was all a testament to their intelligence. These concerts expanded my view of music and opened me up to new creative possibilities that I hadn't even considered before.

- **How have the women in your life shaped your relationship with music?**

When I think of women in music who have had a profound impact on my journey, the first two names that come to mind are my mom, Archana Tamhankar, and Pandita Dr. Veena Sahasrabuddhe. Both have left a lasting impression on my life in

unique ways. While my time with Veena tai was relatively short, I learned so much from her at the young age of 8, and her teachings continue to resonate with me even more as a young adult. She brought so much excitement and joy to music, especially in how she explained taal, sur, and encouraged my creativity. Veena tai is a huge inspiration, and her influence has shaped how I incorporate taal and creativity into my own music.

As for my mom, she's been a constant source of discipline and guidance in my life. Her approach to vocal techniques and riyaaz has been essential in shaping how I think about singing. She has always encouraged me to ask questions and approach music in my own way, never holding me back from exploring. A big part of how and why I critically analyze music today is because of her.

Beyond these two incredible women, I find inspiration from so many others. Women have played such a pivotal role in shaping Indian classical music, both in the past and present. Whether it's legendary figures like Pandita Dr. Ashwini Bhide Deshpande, Pandita Shubhada Paradkar, Vidushi Shalmalee Joshi, and Vidushi Kishori Amonkar (just to name a few), or musicians from the Carnatic community, my kathak guru Smt. Anuradha Nag, and local Bay Area talent, there's no shortage of incredible women shaping the field. Even you, my sister, are a constant source of knowledge and inspiration. Women continue to serve as pinnacles of creativity and inspiration in Hindustani classical music, and I look forward to supporting and uplifting the next generation of women in this rich tradition.

- ❖ **What does success in your career look like to you personally? Is it about recognition, personal growth, or something else?**

Success is a very individual concept that can vary from one musician to another. For me, it means having the knowledge and expertise to push music forward, especially through creation. Music is incredibly personal to me; recognition is not and will never be my focus. I can only share my music with others after it has lived in my mind for countless hours, whether I'm aware of it or not. Because of that, I find that the desire for approval and recognition—from others, whether positive or negative—can disrupt my personal connection to my art. I also believe that chasing fame or external validation isn't something that lasts in the long run. When you step onto the stage and start singing, all of that fades away because, ultimately, it's just you and your music. What matters most to me is the joy I find in music, the freedom to create whatever and whenever I want, and staying true to tradition and musicality. For me, success is understanding music deeply and maintaining the personal relationship I have with it.

- ❖ **Have you faced moments of self-doubt in your career? If so, how do you overcome them?**

I truly believe that confidence is everything. While self-doubt is something we all experience, it can hold you back from reaching your full potential, especially in an upaj, improvisation-driven art form like Hindustani classical music. One thing I've learned about self-doubt is that the more you focus on it, the more it diminishes your confidence, and it becomes an endless cycle. There have definitely been performances where things didn't go as I expected, and I have spent time afterwards analyzing every single moment that could have caused it. But I've come to realize that it's ultimately a waste of time. Everyone makes mistakes, especially when you're on stage, thinking and executing ideas in real time. What's important is not letting those moments define you or make you question your abilities. Confidence is key—it's the only thing that will allow you to get back up and perform with conviction. Take constructive criticism, but don't internalize it in a way that

causes you to doubt yourself. And most importantly, understanding your own strengths in music helps you push through those challenging moments. Knowing when and how to execute, understanding your vocal limits, and recognizing what suits your voice without overexerting yourself—these things boost your confidence and help you accept the bumps in the road without losing faith in your journey.

- **What advice would you give to young women who want to pursue Indian classical music whether it's as a career or as a hobby?**

While I don't feel entirely qualified to give advice, I can share what I've learned so far and hope it resonates with someone. First and foremost, being a Hindustani classical musician should never limit you to just that one label. Music is a vast, evolving world, and there's knowledge you can gain from places you might not expect! Personally, I listen to all kinds of music—rap, pop, jazz, R&B, ghazals, Carnatic music, and even plain Kathak, Bharatanatyam, and Odissi 'bols' and tracks—and I've found valuable lessons in each.

As I mentioned earlier, pursuing music requires a deep level of confidence in yourself. Everyone will have their own opinions, but it's important to learn which voices to listen to and which ones to set aside. And finally, I really hope that today's generation of women musicians, as well as those to come, never lose sight of the value they bring to the art form. Even though society and communities often have many ways of discriminating against women, pure music itself is impartial. Your talent, your work, and your intelligence speak for themselves—and that's something no one can ever take away from you.

- **Artist - Preeti Tamhankar**
- **Interviewer - Sharwaree Tamhankar**

Bay Area, California

## YUWA

**YUWA Team Engagement in main committee programs – Initiative to Engage YOUTH in MMD activities**

Maharashtra Mandal of Detroit's (MMD) this year's committee decided to engage a youth team into all mandal programs with the objective of transferring the culture to the new generation while acquiring some volunteering skills. This helps youth to learn and develop leadership qualities, and feel engaged throughout the year. On the day of the program they are able to demonstrate the new skills acquired during this process.

I would like to thank our 2025 President Varsha Patre, for her vision and leadership style. She makes sure that our youth are exposed to all MMD team efforts. This gives the YOUTH team opportunities to learn by observing. They understand the importance of the occasion behind each MMD event that takes place in the Marathi community - like Ganesh Utsav, Gudi Padwa, Diwali, Sankrant etc.. I believe that as responsible adults of a community, it's our privilege to transfer the knowledge to the next generation in the best possible way.

The MMD youth team has expressed their experience, in their own words.

**MMD youth Team**

- **How is our youth team structured?**

Our youth team comprises members from grades 8 and above, who work alongside the core committee to organize and manage exciting events and affords opportunities for the youth to celebrate our Marathi culture.

- **How do we get to engage in main events?**

The youth committee is led by the youth president and the vice president who coordinate

with the MMD committee to engage the youth team into the main MMD events and allow themselves to be more active and involved. They ensure that the youth will get enough support to volunteer and make an impact!

- **Youth Team plans for this year**

Our plans for this year are engaging in community service activities to give back to society and develop leadership skills, encouraging youth to volunteer for various roles in organizing events, gaining experience and building connections within our community.

- **Experience in Sankranti program being involved in main event**

The youth volunteers had a great experience with the Sankranti event. There was so much work put into the event by many hard-working youth volunteers! We had some roadblocks along the way, but with the help of our mentor Amita Joshi and youth team president we were able to overcome those obstacles. This gave us learning opportunities in how to arrange food stalls, where to keep water stations and how logistics of food replenishment works. So much to learn.

This was our first program of the year working with the program committee, being part of the event planning and execution. All youth members were encouraged and motivated to volunteer and make the event memorable for all participants.

We were able to distribute the MMD YOUTH workforce equally into different areas such as registration, serving food and even giving वाण! Overall, the program was very well managed, and the youth committee had an awesome experience. Our youth committee is now actively involved in planning our upcoming program of Gudhi Padawa!

- **Pravin Pingle, Detroit**

## होळी

सण होळीचा, गुलाल उडतो चोहीकडे गोकुळी
रंग लावतो छेडूनी कान्हा, तमा न त्याला मुळी
रंगून गेली शतरंगांनी हर गोपीची तनू
इंद्रधनू वाटते उतरले धरणीवरती जणू
परी राधिका एकटीच ती कशी काय सुटली?
कायेवरती तिच्या न दिसते रंगछटा कुठली
सारे पुसती तिला मिळूनी काय असे गूज
कसे सोडले गोविंदाने सखे तुला आज?
हसुनी वदते त्यांस राधिका कशास संदेह
सावळला घनश्यामासंगे कधीच हा देह
रंग कोठले त्या शरीराला स्पर्शती न आता
जडली ज्याला हरी-प्रीतीची कृष्णरंगी बाधा

- **अनिता म. कांत**, सॅन रमोन, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## जाता ट्युलिप फुलांच्या नंदनवनात



केउकेनहॉफ गार्डन, ज्याला 'युरोपचे गार्डन' म्हणून संबोधले जाते, हे लिसे, नेदरलँड्स येथे स्थित एक जगप्रसिद्ध वनस्पती उद्यान आहे. त्याचा इतिहास १५ व्या शतकाचा आहे. आता केउकेनहॉफ म्हणून ओळखला जाणारा तो भाग मूळतः काउंट्स ऑफ टेलिंगेनच्या इस्टेटचा भाग होता. ते त्यांच्या शिकारीचे ठिकाण म्हणून काम करत होते. १५ व्या शतकात, Count कुटुंबासाठी ताजे उत्पादन देण्यासाठी इस्टेटवर किचन गार्डनची स्थापना करण्यात आली. "केउकेनहॉफ" हे नाव डच शब्द "केयूकेन" (स्वयंपाकघर) आणि "हॉफ" (बाग) पासून आले आहे.

अशीच एक मी ट्युलिप प्रेमी. १९८१ मध्ये आलेल्या सिलसिला चित्रपटातील गाण्यामधील ट्युलिपच्या फुलांचे मळे पाहून, नायगरा फॉल्स पार्क मधील सुंदर ट्युलिप्स, लोकल फुलांच्या

दुकानातील ट्युलिप्स बघून , या फुलांच्या प्रेमात पडले आणि त्यांच्या जन्मस्थानाबद्दल युट्यूबवर शोध घेताना, केउकेनहॉफ गार्डनच्या विडिओने उलगडा झाला. अनेक वर्षांनी सुवर्ण योग घडून आला आणि ॲमस्टरडॅमच्या ट्रिपमध्ये ट्युलिप्स फेस्टिवल बघण्याचे भाग्य लाभले. केउकेनहॉफ पार्क वसंत ऋतूमध्ये फक्त २ महिने मार्चच्या तिसऱ्या आठवड्यापासून ते मेच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत पर्यटकांना खुले असते . लाखो निसर्गप्रेमी दर वर्षी या बागेचे दर्शन घेतात.


आम्सटरडॅमवरून टुरिस्ट Shuttle बसने Lesse, Holland गावात या बागेच्या प्रवेशद्वारापाशी उतरलो. आवारात २० टुरिस्ट बसेस आधीच थांबल्या होत्या. तिकीट स्कॅन करून बागेत व्हिजिटर सेंटर प्रवेश करताच अवाक झालो..

केउकेनहॉफ पार्कचे ७५वे वर्धापन वर्ष साजरे होत होते. हे फुलांनी भरलेले ३२ हेक्टर, ७० एकर पार्क आहे.

काय आधी, काय नंतर बघावे कळेना. पार्क मॅप घेऊन पायी सुरवात केली. स्प्रिंग फ्लॉवर शो - सुंदर विविधरंगी ट्युलिप्स, हायसिंथ्स आणि डॅफोडिल्सचे मोठे ताटवे, नाजूक दोरीचे कुंपण घालून वळणदार रस्त्याच्या दुतर्फा डोलत होते. क्लासिक लाल आणि पिवळ्यापासून ते विदेशी जांभळे आणि गुलाबी रंगांपर्यंत, कधीही न पाहिलेल्या सुंदर, मोहक रंगसंगतीचे ट्युलिप्स दिसत होते.

उद्यानाच्या मध्यभागी मुलांसाठी विविध मनोरंजक क्रियाकलाप दिसले. हजारो पर्यटक पार्क मधून गडबड गोंधळ न करता शांतपणे फुले बघत, त्यांची नावे, माहिती वाचत, सेल्फीने, स्वतःचे फुलासोबत फोटो घेत होते. चालून दमलात तर कॅफेटेरिया, स्मरणिका (सौवेनियर्स), ट्युलिप्सच्या कंद विक्रीसाठी गिफ्ट शॉप होते. त्या दिवशी इस्टर संडे होता, तरीही इस्टर बनी कसल्याही स्वरूपात काही दिसला नाही.

नेदरलँड्समधील सर्वात प्रसिद्ध पवनचक्क्यांपैकी एक या फ्लॉवर पार्कमध्ये आहे. पवनचक्कीतून तुम्हाला ट्युलिप फील्डचे सुंदर दृश्य दिसते. पवनचक्कीच्या मागे ट्यूलिपच्या शेतात केउकेनहॉफ बोट ट्रिप घेतली. 'सिलसिला'चे ते ट्युलिप्स मळे एकदाचे दिसले.



जुलियाना पॅव्हेलियनमध्ये छान प्रदर्शन Keukenhof 75 पाहता आले. या प्रदर्शनात केउकेनहॉफ आणि ट्युलिप्सबद्दल सर्व माहिती होती.

१९४९ मध्ये केउकेनहॉफ गार्डन स्प्रिंग फ्लॉवर शो म्हणून लोकांसाठी खुले करण्यात आले. यामागे डच बल्ब फुलांचे सौंदर्य प्रदर्शित करणे आणि पर्यटकांना आकर्षित करणे हे उद्दिष्ट होते. ट्युलिप्स, हायसिंथ आणि डॅफोडिल्सच्या सुंदर प्रदर्शनांमुळे या बागेने त्वरीत आंतरराष्ट्रीय ओळख मिळवली. हे उद्यान 'बल्ब लागवड संशोधन' आणि 'विकासाचे केंद्र' म्हणून देखील काम करते. डच फ्लॉवर उद्योगाला चालना देण्यासाठी हे महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. आज, केउकेनहॉफ गार्डन हे डच फुलोत्पादनाचे प्रतीक आहे आणि जगभरातील निसर्ग प्रेमी आणि फुलांच्या प्रेमींसाठी एक लाडके ठिकाण आहे. त्याचा समृद्ध इतिहास आणि आकर्षक फुलांची प्रदर्शने वर्षानुवर्षे ट्युलिप प्रेमींना मोहित करत राहतात.

ट्युलिपचा सर्वात ज्ञात अर्थ परिपूर्ण आणि गहिरे प्रेम आहे. ट्युलिप हे एक उत्कृष्ट फूल असल्याने अनेक शतकांपासून ते प्रेमाचे प्रतीक आहे आहे. तुमचा जोडीदार, मुले, आई-वडील किंवा भावंड असोत, ज्याच्यावर तुमचे मनापासून, बिनशर्त प्रेम आहे, अशा व्यक्तीला देण्यासाठी ट्युलिप्स आदर्श आहेत.

फुलांच्या सहवासात वेळ कसा गेला कळले नाही. परतीच्या बसची वेळ झाली.


ट्युलिप फुलांनो - कर माझे जुळती !

- **अश्विनी चौथाई,** एडिसन, न्यू जर्सी

## आपणच आपले जेलर

साधारणपणे दर चार पैकी पाच लोक गणिताला घाबरतात आणि ते तसं कबूलही करतात. त्यातील बहुतांश लोक हेही सांगतात की त्यांना गणिताचे शिक्षक चांगले मिळाले नाहीत म्हणून असं झालं. खरंतर त्यांचं गणित वाईट नसतं. पुढे जाऊन त्यांच्यातले अनेक वेगवेगळ्या व्यवसायांमध्ये शिरतात, जिथे पैशांचं गणित करावं लागतं आणि त्यांना ते बऱ्यापैकी जमतंही. माणसांचीही गणितं करावी लागतात आणि तीही बहुतांशांना जमतात. मागच्या बाकांवर बसून नंतर पुढारी झालेल्या लोकांचे तर विचारायलाच नको.

पण "गणित येत नाही" असं म्हणणाऱ्या या लोकांकडे, त्यांचे लक्ष असताना तुम्ही थोड्या अंतरावरून जर एखादा चेंडू फेकला तर नकळत आणि सहजच योग्य दिशेला हात जाऊन ते तो चेंडू पकडतात. यात खरंतर अनेक ठिकाणी गणित येतं आणि तेही साधंसुधं नाही. चेंडू किती वेगाने फेकला गेला, कोणत्या दिशेने जातो आहे, आपला हात कोणत्या बाजूला नेल्याने तो पकडता येईल, चेंडूचं वजन किती आहे आणि त्यामुळे आपल्या हाताची हालचाल कशी




करायची ज्यामुळे तो पकडतांना हाताला वेदना होणार नाहीत, वगैरे. ही सर्व गणितं तत्काळ आणि जवळजवळ आपोआप होतात. असं असताना त्यांना गणित येत नाही असं कसं म्हणायचं? सुरुवातीपासून दैनंदिन गोष्टींसाठी झालेल्या मेंदूच्या प्रशिक्षणामुळे हे गणित बऱ्यापैकी पक्कं झालं असतं. इथे नमूद करायला हवे की हे गणित 'गणन' या प्रकारात मोडते. कुत्र्यांसारख्या प्राण्यांना पण चेंडू पकडण्यासारख्या गोष्टींमध्ये प्रशिक्षित करता येतं. वर उल्लेख केलेल्या लोकांना थोडी एब्सट्रॅक्ट, म्हणजे दैनंदिन जीवनापासून हटके वाटणारी गणितं दिली तर मात्र त्यांची बोबडी वळते. उदाहरणार्थ, 100 ग्रॅमचा एक चेंडू ताशी 20 किलोमीटर या वेगाने क्ष अक्षाला समांतर जात असेल आणि त्याचवेळी दहा मीटरवर असलेला एक रोबोट ज्याच्या हाताचे वजन 600 ग्रॅम आहे, त्याने तो हात किती वेगाने आणि कोणत्या दिशेने हलवावा जेणेकरून तो चेंडू पकडता येईल? खरं तर हे आधीचंच गणित आहे, फक्त शब्द बदलले आहेत. पण प्रयत्नाने त्यांना ही गणिते करता येतील. कुत्र्यांना मात्र नाही.

आणखी एक गणित पहा: एका रांजणात 37 पांढरे आणि 52 काळे चेंडू आहेत. तुम्ही डोळे बंद करून रांजणात हात घालून दोन चेंडू बाहेर काढता. त्यापैकी एक काळा आणि एक पांढरा असण्याची शक्यता किती? कागद पेन्सिल वापरून हे थोड्या प्रयत्नाने करता येऊ शकतं. चार शक्यता आहेत:

(१) दोन्ही काळे चेंडू, (२) दोन्ही पांढरे चेंडू,

(३) पहिला काळा आणि दुसरा पांढरा, किंवा

(४) पहिला पांढरा आणि दुसरा काळा.

पहिला काळा असायची शक्यता 52/(52+37). पहिला जर काळा असेल तर आता रांजणात 51 काळे उरले असे असताना दुसरा पांढरा असायची शक्यता 37/(37+51). याच प्रकारे आधी पांढरा आणि मग काळा याची शक्यता किती हे काढता येते. त्यांची बेरीज केली की आपल्याला हवे असलेले उत्तर मिळते (52/89×37/88 + 37/89×52/88).

बहुतांशांना प्रश्न पडतो की प्रत्यक्ष आयुष्यात अशा गणितांची गरज पडते तरी केंव्हा? कशाला करायच्या या नसत्या उठाठेव्या. हा प्रश्न काही गणितज्ञांनाही वेगळ्या प्रकारे पडतो. संभाव्यता सिद्धांतात दोन प्रवाद आहेत. फ्रिक्वेंटिस्ट किंवा वारंवारिता वापरणारे आणि बयेसियन म्हणजे बयेज् या गणितज्ञाच्या प्रमेयांवर आधारित पद्धतीचा अंगीकार करणारे. जर तुम्हाला आधीच माहिती असेल की रांजणात 37 पांढरे आणि 52 काळे चेंडू आहेत तर त्यासंबंधीचे कितीही किचकट गणित तुम्ही करू शकता. पण दैनंदिन आयुष्यात स्थिती साधारणता तशी नसते. समोर एक रांजण आहे. त्यातून तुम्ही दोन चेंडू काढले, त्यातला एक काळा होता आणि एक पांढरा होता. यावरून सांगा की रांजणात चेंडू किती आहेत, कोणत्या रंगाचे आहेत, त्यात लाल आहेत का, निळे आहेत का, वगैरे. मिळालेल्या थोड्या माहितीवरून आधीचे कयास बदलावे लागतात. अशी परिस्थिती प्रत्यक्ष आयुष्यात नेहमीच येते. शेन वॉर्न तीन गुगली आणि तीन उजव्या यष्टी बाहेर चेंडू टाकतो असे माहीत असताना पहिलाच जर फुल टॉस आला तर फलंदाजाला गणितच बदलावे लागते. पुढच्या फलंदाजाला कळणार की वॉर्न चुकून का होईना फुलटॉसही देऊ शकतो. उपलब्ध पुरावे जसे जसे वाढत जातात तसे तसे अधिक प्रगल्भ ठोकताळे बांधणे शक्य होते.

यावरचा एक विनोद प्रसिद्ध आहे. एकदा स्कॉटलंडमध्ये एका आगगाडीने एक इंजिनियर, एक भौतिकशास्त्रज्ञ, आणि एक गणितज्ञ जात होते. त्यांना बाहेर एक काळी मेंढी दिसली. ती पाहून त्यांच्यातला इंजिनियर पटकन म्हणाला, "अरे, स्कॉटलंडच्या मेंढ्या काळ्या असतात". त्यावर भौतिकशास्त्रज्ञ म्हणाला, "तुला असं म्हणायचं आहे का, की स्कॉटलंडमधल्या काही मेंढ्या काळ्या असतात?" त्यावर गणितज्ञ म्हणाला, "नाही, नाही, आपण एवढेच म्हणू शकतो की स्कॉटलंडमध्ये निदान एक मेंढी आहे आणि निदान तिची जी बाजू आपल्याला दिसते आहे ती काळी आहे". अशा काटेकोरपणाची गणितात आवश्यकता असते.

अशाप्रकारे आपण सगळेच सतत वेगवेगळी प्रारूपे (models) कळत-नकळत बनवत असतो. त्यात कळत नकळत चुकाही करत असतो. आपण माहिती किंवा पुरावे कसे गोळा करतो, कोणत्या माहितीला किती प्राधान्य देतो आणि काही सहसंबंधांना (correlation) चुकून कार्यकारण भाव (causation) समजून बसतो का, यावरून आपलं गणित किती बरोबर आहे हे ठरतं. सहसंबंधांनाच कार्यकारणभाव समजून झालेल्या चुकांमुळे कधी कधी लोक फसलेल्या धंद्यामध्येच अजून पैसे टाकत राहतात, किंवा बदलाची कल्पना करू शकत नसल्यामुळे नोकरी बदलत नाहीत, त्रास देणाऱ्या मित्र किंवा नातेवाईकांपासून दूर जात नाहीत, वगैरे. आपल्या आयुष्यात कोणत्या गोष्टींमुळे किती दूरगामी परिणाम होतात हे न समजल्यामुळे असं होतं.

पण किचकट गणितांनाही साखळीबद्ध कमी किचकट गणनप्रक्रियेत मांडता येते कारण कितीही किचकट काम असलं तरी

त्याची एक निश्चित, साचेबद्ध प्रक्रिया असते. गहन प्रश्नांचे छोटे छोटे भाग करून हे शक्य आहे. मशीन लर्निंग आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीने अशा कितीतरी पद्धती आता संगणकांना शिकवता येतात. यात सहसंबंध शोधणेही आले. सुपूर्द केलेली विदा (data) अनेक प्रकारे पिंजल्या जाऊन ही संगणकीय प्रारूपे बनतात. त्यातील कार्यकारण भाव जरी नाही तरी सहसंबंध शोधले जातात आणि त्यासोबत दिलेल्या सूचीच्या आधारे ही प्रारूपे बरंच काही आत्मसात करतात. निबंध लिहिणे, चित्र काढणे, चित्रफिती बनवणे अशा अनेक गोष्टी या किचकट गणितांद्वारे स्वयंचलित करणे शक्य होत आहे. अर्थात हेही दिसतंच आहे की दिलेली विदा योग्य नसेल तर ती प्रारूपे चुकाही करतात. खरं तर आपला मेंदूही सुरुवातीला असेच शिकतो - नवीन गोष्टी पाहणे, त्यातील सहसंबंध शोधणे आणि त्या अनुरूप कार्य करणे, यातूनच आपण नव्या गोष्टी शिकत असतो. अगदी लहान मुलंही गोष्टी पटापट शिकतात. आई-वडिलांना, मोठ्या भाऊ-बहिणींना, मित्र-मैत्रिणींना, शेजाऱ्यांना, शिक्षकांना पहात, त्यांच्यासारखंच करायचा प्रयत्न करत शिकत असतात. हे सगळे आपले शिक्षकच. नैतिकाची आणि अनैतिकाची जाणपण त्यांच्याकडूनच येते. ज्याप्रमाणे चुकीच्या विदेतून संगणक चुकीच्या गोष्टी शिकू शकतात त्याचप्रमाणे आपल्या शिक्षकांकडून, आई-वडिलांकडून जर त्यांना योग्य वाटत असलेल्या पण चुकीच्या गोष्टी आपल्याला शिकवल्या गेल्या तर आपणही तसेच बनणार. आपले आई-वडील आपल्या भल्याचाच विचार करतात. पण ते समाजाचे भलं चाहतात का, देशाचं आणि जगातल्या सर्वांचं भलं त्यांच्या चित्ती असतं का हे आपण न कळत्या वयात जाणू शकत नाही, सांगू शकत नाही आणि नंतर कदाचित आपणही तसेच झाल्यामुळे आपण ते ओळखू शकत नाही किंवा आपल्याला त्याचे काही वाटत नाही.

खरंतर मोठं झाल्यावर (वयाने?) जगातल्या न्याय-अन्यायाकडे पाहून स्वत:मध्ये थोडेफार बदल सर्वांनीच करायला हवेत. पण, बहुतेकांचा आसमंत छोटा असतो. दोन वेळेचं अन्न, डोक्यावर छप्पर, थोडासा आराम हे सर्व जर दुरापास्त असेल तर समाजाचा विचार किंवा जगाचा विचार कोण कसं करणार किंवा करावा तरी का? आपण भले आणि आपले जग भले अशी बहुतांशांची स्थिती असते. मात्र शेजारच्यांबरोबर किंवा जवळपासच्या इतर लोकांबरोबर संघर्ष निर्माण झाला की कैद्याची द्विधावस्था अर्थात प्रिजनर्स डायलेमा उद्भवतो. गेम थिअरी -- म्हणजेच समाजशास्त्रात वापरता येण्याजोग्या गणितीय प्रारूपांचा अभ्यास करणारी शाखा -- यामधील एक सिद्धांत आहे ज्यात दोन व्यक्तींना एकमेकांपासून स्वतंत्रपणे निर्णय घ्यावा लागतो. उदाहरणार्थ, एकाच गुन्ह्यासाठी पकडल्या गेलेल्या दोन गुन्हेगारांना अटक करून वेगळे ठेवून प्रश्न विचारण्यात येतात. जर दोघेही मौन राहिले तर दोघांना सौम्य शिक्षा मिळते. परंतु, जर कुणा एकानेच दुसऱ्याविरुद्ध पुरावा दिला, तर तो सुटण्याची शक्यता असते आणि दुसऱ्याला कठोर शिक्षा मिळते. जर दोघांनीही पुरावे दिले, तर दोघांनाही मध्यम शिक्षा मिळते. अशा परिस्थितीत, सर्वांनी आपापल्या हितासाठी घेतलेले निर्णय सर्वांसाठीच कमी फायदेशीर ठरतात, आणि सहकार्य केल्यास अधिक चांगला परिणाम होऊ शकतो. अर्थात हे एखादी परिस्थिती वारंवार उद्भवणार असल्यास. एखाद्या वेळेसच उद्भवणाऱ्या परिस्थितीमध्ये हवा तितका फायदा मिळवल्याने अहित होईलच असे नाही. अशावेळी कसे वागायचे हा एक मोठा प्रश्नच असतो आणि त्यालाच इथे द्विधावस्था म्हणले आहे. श्रमविभाजनामुळे समाजाची रचना अशी झाली आहे की आपले बहुतांश निर्णय नगरपालिका, राज्य सरकार, मध्यवर्ती सरकार वगैरे घेतात. समाजात आपण स्वतंत्र असलो तरी सर्वांशी सहकार्य करण्याऐवजी आपण आपल्याभोवती, आपल्या गटांभोवती अदृश्य भिंती बांधून घेतो, आणि या आपणच तयार केलेल्या तुरुंगातील कैदी असल्याप्रमाणे इतरांविरुद्ध कागाळ्या, कारवाया करतो. राज्यकर्तेपण अदूरदर्शी असल्यामुळे याचा फायदा घेतात आणि सगळ्यांना मध्यम शिक्षा देत स्वत:चीच पोळी भाजायचा प्रयत्न करतात.




राजकारणातील हा अदूरदर्शीपणा एखाद्या देशातील उलथापालथीला कारणीभूत ठरतो. त्यामुळे अनेक दशकांचे कार्य नष्ट होते आणि गोष्टी पूर्वस्थितीला येण्यास बराच काळ जावा लागतो. तोडफोड सोपी असते, पुनर्बांधणी नाही. राजकारणातली उदाहरणे ठळक असतात, पण तशीच जरा जास्त गुंतागुंतीची आपल्या आसपासही असतात.

या दुष्टचक्रातून बाहेर पडायचं असेल तर आपण काय करू शकतो? प्रथम हे कबूल करायला हवं की कदाचित आपण अशा भिंती आपल्याभोवती बांधत असतो. त्याचप्रमाणे आपल्या मेंदूचे प्रशिक्षण, त्यात भरलेली विदा योग्यायोग्यतेसाठी तपासायची आवश्यकता मान्य करायला हवी. तसंही आपण सध्या करत असलेल्या अनेक गोष्टी स्वयंचलित होत आहेत. या परिस्थितीत जुन्या गोष्टी त्या आपलं सोनं करतील असा विचार करून शिकत राहण्याऐवजी दूरदर्शी विचार आणि दूरदर्शी शिक्षण कसं असायला हवं याचं शिक्षण आपण घ्यायला हवं आणि शाळांमधून द्यायला हवं. अदूरदर्शी लाभांच्या मागे न लागता सर्वांच्या दृष्टीने चांगले लांब पल्ल्याचे लाभ कोणते हे हेवेदावे बाजूला

ठेवून पाहायला हवे. ज्या लोकांना दोन वेळचं जेवण मिळवण्यातच सर्व पणाला लावावे लागते त्यांचा भार कसा कमी होईल हेही आपण पहायला हवे. त्यांनी स्वत:चा विचार करू नये असे मी म्हणणार नाही, पण ते विचार करू शकण्याच्या स्थितीत येतील यासाठी इतरांनी मदत करायला हवी. हातोहात किंवा लगोलग मिळणाऱ्या फायद्याऐवजी लांब पल्ल्याचा विचार करायला हवा.

ते गुंते नीट विचार करून, सल्लामसलत करून सोडवणे सगळ्यांनी शिकायला हवे. तर्कसंगत काय आहे आणि काय नाही हे समजण्याकरता साधी आकडेमोड करता यायला हवी. केवळ लोकांनी सांगितलेल्या आकड्यांवर विश्वास न ठेवता सगळे विचार करू लागल्यास अनेक चुकीच्या समजुतींना मूठमाती मिळेल. आयुष्याचे हे गणित कठीण नाही - आपण ते शिकायलाच हवे. काही प्रश्नांसाठी जास्त वेळ द्यावा लागणे साहजिक असते - प्रत्येक गोष्टीचे उत्तर तडकाफडकी मिळण्याच्या अपेक्षांचा शेवट वाईटातच व्हायची शक्यता जास्त. आपल्याच घरांपासून, मित्रपरिवारांपासून सामंजस्याने आणि दूरदृष्टीने आयुष्याची गणिते सोडवण्याची सुरुवात करूया. नाहीतर आपण सगळेच जन्मठेपेचे कैदी.

- **आशिष महाबळ,** पॅसाडेना, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## ‘पाय डे” स्पर्धा

**पात्र :** शिक्षक, विहान , जय, अभिषेक, रिया, मानवी

**शिक्षक :** नमस्ते मुलांनो ! १४ मार्चला पाय डे आहे. कोणाला माहिती आहे का? *(सगळे हात वरती करतात )*

**शिक्षक:** जय, तू सांग.

**जय :** पाय म्हणजे फूट. *(सगळे हसतात )*

**शिक्षक :** नाही. मानवी, तुला माहिती आहे का?

**रिया :** पाय ही खाण्याची गोष्ट आहे. *(सगळे हसतात )*

**अभिषेक :** मला पाय खायला खूप आवडतो.

**मानवी:** माझा आवडता पाय स्ट्रॉबेरी पाय आहे.

**जय :** स्ट्रॉबेरीपेक्षा मला चॉकलेट पाय आवडतो.

**शिक्षक :** थांबा .. थांबा .. तो पाय नाही. अजून कोणाला माहीत आहे का? गणितातला पाय? विहान?

**विहान :** पाय हा एक अंक आहे.

**शिक्षक :** अगदी बरोबर! पाय हा एक न संपणारा अंक आहे. आणि पुढच्या शुक्रवारी हा अंक बोलण्याची स्पर्धा आहे.

**सगळे :** न संपणारा अंक कसा बोलायचा ?!?!

**शिक्षक :** खूप सगळे अंक बोलायचे नाही आहेत ..

**रिया :** मग, किती अंक बोलायचे आहेत?

**शिक्षक :** १० पर्यन्त.

*(एक आठवडयानंतर.. पुढच्या शुक्रवारी ..)*

**शिक्षक :** सगळे तयार आहात का?

**सगळे :** हो !!

**शिक्षक :** एकानंतर एक, सगळे पाय ह्या अंकातले अंक सांगणार. कोणाला सुरुवात करायची आहे? *(सगळे हात वरती करतात )*

**शिक्षक :** अभिषेक, तू सुरू कर.

**अभिषेक :** तीन पूर्णांक एक चार एक .... पुढचं आठवत नाही मला.

**शिक्षक :** ठीक आहे. रिया तू सांग.

**रिया :** 3.1415.... .. मला पण नाही आठवत.

**शिक्षक :** ठीक आहे. जय, आता तू बोल ..

**जय :** 3.14159...........3 ??

**शिक्षक :** नाही, सहावा अंक तीन नाही आहे. मानवी तू सांग आता.

**मानवी :** 3.141592653 .. शेवटचा अंक आठवत नाही.

**शिक्षक :** बरं, विहान तू सांग.

**विहान :** 3.1415926535

**शिक्षक :** मस्त!! ही स्पर्धा विहानने जिंकली!

*(सगळे टाळ्या वाजवतात )*

**शिक्षक :** विहान, तुला काय हवं? स्टिकर की पेन्सिल ?

**विहान :** स्टिकर.

**शिक्षक :** हे घे. मुलांनो, तुम्ही आज पायचे अंक खूप छान म्हणालात. आणि .... *(जय हात वरती करतो ..)*

**शिक्षक :** काय झालं जय ?

**जय :** चार वाजले.

**शिक्षक :** अरे, खरंच कि !! अच्छा मुलांनो ! उद्या भेटूया !!

**सगळे :** अच्छा!!!

- **राघव महाजन,** बाल्टीमोर, मेरीलॅंड



## श्री शैलगमन उत्सव

धूप, दीप, मंगलवाद्ये, फुलांची आरास, दारापुढचे तुळशी वृंदावन, मोठी रांगोळी आणि हसतमुखाने दाराजवळ उभे असलेले परम पूज्य श्रीराम महाराजांचे शिष्य श्री. व सौ. राऊत आणि श्री. व सौ. बुजोने दांपत्य. अगदी बरोबर आपण दरवर्षीप्रमाणे यावर्षीही कॅलिफोर्निया अमेरिका येथे आयोजित केलेल्या श्री शैलगमन उत्सवाबद्दल बोलत आहोत. यावर्षी हा उत्सव ८ व ९ फेब्रुवारी २०२५ या दिवशी अतिशय उत्साहाने, आनंदाने अनेक पारमार्थिक कार्यक्रमांच्या आयोजनाने संपन्न झाला.

गायत्री मंत्र हवनाने उत्सवाची मंगल सुरुवात झाली. सुमारे ८० साधकांना यावर्षी हवनात सहभागी होण्याचे भाग्य लाभले. ८-८ लोकांच्या तुकड्यांमध्ये सुमारे अडीच तास हा स्वाहाकार सुरु होता. शक्तिब्रह्माश्रमाच्या प्रथेप्रमाणे सद्गुरूपरंपरेला पूर्णाहुती देऊन या हवनाची सांगता झाली. आपल्या सगळ्यांच्या परम भाग्याने सद्गुरू प. पू. श्री. मंगेशदादा फडके यांच्या उपस्थितीमुळे या दिवसाचे पावित्र्य, मांगल्य कैक पटींनी वृद्धिंगत झाले. त्यांनी उपस्थित साधक वर्गाला मार्गदर्शनही केले. संध्याकाळच्या सत्राची सुरुवात सायंप्रार्थनेने झाली. शक्तिब्रह्माश्रमात भजन सेवेचे विशेष महत्व आहे. कुठल्याही उत्सवाच्या आदल्या रात्री आश्रमात संपूर्ण रात्र भजन सेवा होत असते. त्याचेच एक प्रतीक म्हणून दरवर्षी अमेरिकेच्या उत्सवात सुद्धा भजन सेवा होते. अनेक नवनवीन भजन सेवेकरी प.पू. नारायण महाराज, प.पू. श्रीराम महाराज यांनी रचलेली अर्थपूर्ण आणि भावपूर्ण भजने सादर करतात. पत्रिकेत दीड तास अशी वेळ दिलेली असली तरी भजन सेवा साधारण तीन तास चालली. गायक, वादक आणि श्रोते सगळ्यांचच वेळेचं भान हरपून गेलं होत. "सद्गुरू तव रूप सदा नयनी राहू दे", "सदा संत सेवेत वृत्ती जडू दे", "निरंजन माला घट मे फिरे दिन रात" ते "बडनेरवाले बाबा जय हो तुम्हारी जय हो" ही भैरवी अशी एकामागून एक आशयघन भजने सादर होत होती आणि सगळ्यांची मिळून सामुदायिक गायनसेवा, वादनसेवा आणि श्रवण सेवा घडत होती. यानंतर दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा चा गजर झाला , सद्गुरूंची आरती झाली आणि सुग्रास भोजन प्रसादाने या सत्राची सांगता झाली.

दर वर्षीचे तिसरे सत्र विशेष महत्वाचे असते. शक्तिब्रह्माश्रमातून प.पू. श्री. श्रीराम महाराजांच्या पादुका श्री. व सौ. विराज राऊत यांना प्रसाद रूपाने मिळाल्या आहेत. एका बाजूला या पादुकांची पूजा आणि दुसऱ्या बाजूला प.पू. सद्गुरू श्री. मंगेशदादांची पाद्यपूजा असे एकावेळी सुरु असते. या वर्षी पादुका पूजन श्री. व सौ. बुजोने दांपत्याने केले. तर श्री. व सौ. राऊत दांपत्याने परम पूज्य श्री. मंगेशदादांचे सद्गुरू पूजन केले. देशातले सद्गुरू आणि पादुका रूपाने उपस्थित असलेले श्रीराम महाराज यांची पूजा करताना, तो सोहळा अनुभवताना एक वेगळीच अनुभूती होते. सद्गुरू हे तत्व आहे आणि परम पूज्य श्री. मंगेशदादांनी सांगितल्याप्रमाणे त्यांची पाद्यपूजा ते त्यांच्या सद्गुरुंना अर्पण करतात, त्यांचे सद्गुरू त्यांच्या सद्गुरुंना आणि असे करत करत ही पूजा आद्य गुरु नारायण आणि महादेव किंवा दत्तगुरु यांच्यापर्यंत पोचते. यानंतर मंगेश दादांचे आशीर्वचन झाले त्यांनी गुरु परंपरेचे महत्व, सद्गुरूंनी सांगितलेल्या मार्गावर चालण्याचे महत्व आणि गुरु हे तत्व आहे त्याचा अनुभव एकरूपतेने येतो; हे त्यांच्या अमृतवाणीतून उलगडून सांगितले. आणि उत्सवाचे शेवटचे सत्र म्हणजे कळसाचा अध्याय - परम आदरणीय ह.भ.प. सौ. सोनालीताई फडके यांची कीर्तनसेवा. 'वक्तृत्वाचा अधिकार, अल्पास न घडे सत्योत्तर, वक्ता पाहिजे साचार, अनुभवाचा' या वर्णनाशी अगदी तंतोतंत खऱ्या उतरणाऱ्या कीर्तनकार सौ. सोनालीताई फडके.

ईश्वरभक्तीचे नऊ प्रकार आहेत. श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन. नारदांसकट अनेक संतांनी स्विकारलेल्या भक्तीचा प्रकार म्हणजे 'किर्तन'. अतिशय परिपूर्ण साधन म्हणजे भगवंताचे नामसंकीर्तन!

भगवान गोपाळकृष्ण भगवद्गीतेत म्हणतात "सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः", म्हणजेच कीर्तन करणे ही नुसती मनोरंजनासाठी कला नसून ही एक साधना आहे, उपासना आहे. उपासनेबरोबरच जगाला सन्मार्गाला लावणे, त्याला परमार्थाचा यथायोग्य उपदेश करणे, हाही कीर्तनाचा एक मुख्य हेतू आहे.

हा हेतू साधण्याकरिता सोनालीताई कीर्तनात परमार्थाच्या बोधामृताबरोबरच, त्या तत्वज्ञानानुसार जे आयुष्य जगले अश्या देवाच्या, भक्तांच्या निरनिराळ्या कथांचा समावेश करतात. कीर्तनांत ईश्वरस्तुति, भक्ति व वेदांत यांचे निरूपण व विशिष्ट कथेचें आख्यान असते. आता वेदांत रसाळ आणि सोप्प्या भाषेत सांगायचं म्हणजे कीर्तनकार 'अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ' असाच असावा लागतो.

अनेक उपांगांचा यथायोग्य वापर करून, "कथा अन्वय लापणिका। नामघोष करतालिका" तसेच "टाळमृदंग हरिकीर्तन। संगीत नृत्य तानमान। नाना कथानुसंधान । तुटोंचि नेदावे" त्यांनी कीर्तन सर्वांगपूर्ण केले. सौ. सोनालीताईंनी कीर्तनात सर्व रसांचा यथायुक्त परिपोष केला आणि पूर्व व उत्तर रंगांची जुळणी बेमालूम झाली. या वर्षी कीर्तनातून सौ. सोनालीताईंनी सद्गुरू परम पूज्य श्री. सीताराम महाराज ह्यांचे चरित्र सांगितले. श्रोते सुमारे अडीच तास तल्लीन होऊन राहिले असा रंग त्यांनी आपल्या कीर्तनात भरला 'श्रोत्यांचीं श्रवणपुटें, आनंदें भरावीं' असे कीर्तन झाले . पुनश्च आरती आणि सुग्रास भोजन प्रसादाने या सत्राची आणि सगळया सोहळ्याची सर्वांगसुंदर सांगता झाली. || अवधूत चिंत्तन श्री गुरुदेव दत्त ||

- **मृणाल बुजोने**, कुपरटीनो, कॅलिफोर्निया

# विश्व मराठी संमेलन २०२५ - क्षणचित्रे



## विश्व मराठी संमेलन २०२५ - एक अनोखा अनुभव




जगभरातल्या सर्व मराठी बांधवांसाठी एक अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट २०२४च्या ऑक्टोबरमधे घडली आणि ती म्हणजे केंद्र सरकारकडून मराठी भाषेला बहाल करण्यात आलेला 'अभिजात मराठी भाषे'चा दर्जा. तो मिळवण्यासाठी सातत्याने किती प्रयत्न करावे लागले, किती हजारो वर्षांपूर्वीचे पुरावे गोळा करावे लागले आणि या सगळ्याचा किती पाठपुरावा करावा लागला, याच्यावर वेगळा लेख होऊ शकतो. परंतु, अभिजात मराठी भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर पुण्यात फर्ग्युसन कॉलेजमध्ये पार पडलेल्या पहिल्या विश्व मराठी संमेलनाला जाण्याचा मला अचानक योग आला आणि माझ्या मनात आपल्या भाषेची, आपल्या श्रीमंत संस्कृतीची आणि अशा अनेक विचारांची दालनं वहीची पानं उलगडावीत तशी उलगडत गेली. अगदी नवखं, म्हणजे अवघ्या तिसऱ्या वर्षातलं हे संमेलन, पण माझा मात्र पहिला वाहिला अनुभव होता. खरं म्हणजे मी आत्तापर्यंत कधीच कुठल्या साहित्य संमेलनाला गेले नव्हते, किंबहुना, साहित्य संमेलनाला गेल्यावर किती विविध विषयांचा उलगडा होऊ शकतो याची कल्पनासुद्धा केली नव्हती.

मंडळी, मराठी आपली मातृभाषा आहे. लहानपणापासून आपण ती आधी ऐकायला बोलायला शिकतो, मग लिहायला-वाचायला शिकतो. जसे जसे मोठे होतो, मराठीतून अभ्यास करतो, हळू हळू व्यवहार करायला लागतो. मराठीत भांडतो, मराठीत रागावतो, मराठीत आनंद व्यक्त करतो, मराठीत गातो, मराठीत ऐकतो आणि ऐकायचं नसेल तर मराठीतच मनोमनी 'काना डोळा'ही करतो. आपलं सगळं आयुष्य जर आपण मराठी-मय पद्धतीने घालवत असू तर आपल्याला मराठीबद्दल सगळंच माहित असायला हवं, नाही का? मग या आणि अशा अनेक संमेलनात जाऊन आणखीन काय शिकायला मिळू शकतं, याचे उत्तर शोधायला खरंतर मी या संमेलनाला गेले होते.

कुठलीही भाषा मला एखाद्या विशाल समुद्रासारखी वाटते. समुद्र किनारी नितांत सुंदर गार वारा जसा आपल्याला लपेटून मंत्रमुग्ध करतो तशी भाषेची समृद्धी आपल्याला लपेटून घेते असे मला वाटते. हवीहवीशी गार वाळू पायाशी घुटमळत राहते, कधी खोल खोल घेऊन जाते तर कधी वाळूच्या ओलाव्याने हाताला चिकटून राहते. समुद्राची प्रत्येक लाट भरतीची असो किंवा ओहोटीची, तिचे एक स्वतःचे अस्तित्व घेऊन येते, तिची स्वतःची एक गोष्ट सांगते. कधी लाटांमधून मनोहारी शंख शिंपल्यांची उधळण होते, तर कधी हिरमुसलेल्या गोंडस बाळासारखी हाताची घडी घालून शांतपणे पण तटस्थ उभी असते. भाषेचे सुद्धा असेच पैलू असतात की नाही? उंचच उंच नारळाच्या, सुपारीच्या झाडांवर गवसणी घालून आपली नजर जेव्हा पुन्हा जमिनीवर येते, तेव्हा आपल्या अस्तित्वाची उंची कळते. झाडांच्या पार क्षितिजावर, निरभ्र स्वच्छ आकाशावर जेव्हा डोळे किलकिले करूनही फक्त क्षणभर बघायाची परवानगी आपलीच पापणी आपल्याला देते, तेव्हा साहित्य संमेलनात आलेल्या महानुभूतींची उंची कळते. आपल्याच रोजच्या मराठी भाषेची उंची आपल्याला कळायला मदत होते. मला वाटतं ही उंची प्रत्येक मराठी मनाला कळायला हवी, त्या उंचीची जाणीव होऊन, त्याचा सार्थ अभिमान मनापासून वाटायला हवा, तेव्हा कुठे मराठी, मराठी भाषिकांकडून जगभरात आवडीने, उत्साहाने, प्रतिष्ठेने स्वीकारली जाईल.

भारताबाहेर राहताना आणि मुलांना वाढवताना आपल्या भाषेची श्रेष्ठता, आपल्या संस्कारांचे महत्व, आपल्या संस्कृतीची ओळख, समृद्धी, दृष्टीआड होऊच शकते, जर तिची जाणीवपूर्वक आणि स्वतः प्रयत्न करून जोपासना केली गेली नाही तर! माझं असं ठाम मत आहे की प्रत्येकाने आपल्या व्यावहारिक भाषेसोबतच, आपली मातृभाषा मुलांना पहिल्यापासून थोडीफार तरी शिकवली पाहिजे. यामधे भाषेसाठी भावनिक प्रेम, आपुलकी आणि आपली भाषा टिकून राहावी यासाठीची कळकळ असायला हवी. ती नसेल तर शास्त्रीय दृष्टीकोनातून बहुभाषिक असल्याचे फायदे लक्षात घेऊन जरी आपली मातृभाषा शिकवली गेली तरी त्याचे अनेक फायदे वाढत्या वयातील मुलांना नक्की होतील, यात शंकाच नाही.

या विश्व मराठी संमेलनात ए.आय. सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाबद्दल सुद्धा चर्चा झाली कि अशा प्रकारे नावीन्यपूर्ण पद्धत वापरून, सर्च इंजिन्सना आपण मराठी शब्दसंचय, व्याकरण इत्यादींची पूरक माहिती देऊ शकतो, जेणेकरून आपण इंग्रजीच्या बरोबरीने मराठीतही सहज टंकलेखन करू शकू असा विश्वास मला आहे.

एक भाषा, पण ती किती वेगवेगळ्या प्रकारे वापरण्यात येते आणि तिचे किती पैलू असतात हे या साहित्य संमलेनात समजले. पत्रकारिकेतील मराठी भाषा कशी असावी, वेगवेगळ्या काळात, वेगवेगळ्या प्रांतातील कवी मंडळींनी कशी भाषा समृद्ध केली, किती निरनिराळी शब्द संपदा आपल्याला खुली केली, कथा कादंबऱ्यांमधून

दिसलेली मराठी भाषा, संत वाङ्मयापासून ते आधुनिक लेखकांचे अफाट मराठी साहित्य, ग्रामीण साहित्य, महिलांसाठी मराठी साहित्य, लहान मुलांसाठी, युवकांसाठी विविध वयोगटाला समजेल, आवडेल असे साहित्य, प्रशासनातील क्लिष्ट मराठी भाषा, कायद्यातील त्याहूनही क्लिष्ट भाषा, शारीरिक आणि मानसिकरित्या विशेष असलेल्या दिव्यांगांसाठी वापरण्यात येणारी भाषा, विज्ञान आणि तंत्रज्ञानातील मराठी भाषा असे अजून अनेक  विषय घेऊन मराठी भाषेचे किती पैलू उलगडले असतील याची कल्पना तिथे गेल्यावर नक्कीच येते.

एकाहून एक मान्यवरांची मांदियाळी अनुभवणे यामध्ये सुद्धा दैवयोग असावा असे वाटते. ‘सोन्याहून पिवळं’ या वाक्यप्रचाराची प्रचिती येते. जेष्ठ साहित्यिक, पद्मश्री. श्री मधू मंगेश कर्णिक यांना ‘साहित्य भूषण’ पुरस्काराने सन्मानित करताना बघताना खूप छान वाटले. पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांना प्रत्यक्ष ऐकायला मिळाले. कवी श्री. वैभव जोशी, संकर्षण कऱ्हाडे, श्री. रामदास फुटाणे, कौशल इनामदार यांना ऐकायची संधी मिळाली. श्री. महेश मांजरेकर, विजय केंकरे, चंद्रकांत कुलकर्णी, केदार शिंदे यांचे अनुभव आणि मराठी भाषेवरील त्यांची मते ऐकायला मिळाली. मुग्धा-प्रथमेश चमूची अभंगवाणी, महेश काळेंसाठी पाच सहा हजाराहून जास्त समोर बसलेला प्रेक्षक वर्ग, अवधूत, वैशाली, स्वप्नील यांचा स्वर झंकार यांनी तर माणिक मोत्यांप्रमाणे कार्यक्रमाची चित्तवेधकता नवीन उंचीवर नेऊन पोहोचवली.




बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मान्यवरांनी मंडळातर्फे चालवलेल्या उपक्रमाची तपशीलवार माहिती दिली. सद्य अध्यक्ष श्री. प्रसाद पानवळकर आणि मराठी शाळेचे समन्वयक श्री. राहुल देशमुख व सर्व चमूचा सत्कार आणि प्रकल्पांचे सादरीकरण बघणे  म्हणजे डोळ्यांचे पारणे फिटण्यासारखे होते.

खूप वर्षांनी फक्त मराठी पुस्तकांचे न संपणारे प्रदर्शन या निमित्ताने बघण्याचा योग्य आला. प्रत्यक्ष प्रकाशकांनी लावलेल्या स्टॉल्सवर अनेक प्रकारची आणि जुनी नवी पुस्तके बघून आपण कोट्याधीश असल्याचा भास झाला. काही प्रकाशकांची नावे लहानपणापासून माहिती होती, काही नव्याने नावारूपाला आलेली आणि समाज माध्यमातून कळलेली नावे ही बघायला मिळाली.

एवढ सगळं अनुभवून खरोखर चित्त खचाखच भरलं असलं तरी जिभेचे चोचले पुरवण्यात संमेलनामधे रेलचेल होती. भारताबाहेरून आलेल्यांनी नक्कीच तृप्तीची ढेकर दिली असणार यात शंकाच नाही. बृहन्महाराष्ट्र मंडळ आणि मराठी विश्वचे मनापासून आभार ज्यांच्यामुळे या संमेलनाला जायचा योग जुळून आला.

बऱ्याच जणांनी मला विचारलं, ‘तू साहित्य संमेलनाला आली आहेस, म्हणजे नेमकी कशासाठी आली आहेस?’ याचं उत्तर मला मिळालं होतं. ते तुम्हा सर्वांना पाण्याच्या थेंबाएवढं जरी सांगता आलं तरी त्याचा आनंद मला जाणवेल.

भारतातल्या आणि भारताबाहेरील मराठी माणसासाठी नक्की असे सांगावेसे वाटते की अशा प्रकारची छोट्या मोठ्या प्रमाणातली संमेलने, किंवा पुस्तक प्रदर्शने, ठिकठिकाणी, गावो गावी आयोजित केली जातात. अशा कार्यक्रमांना मुलांना लहानपणापासून घेऊन जाता येत असेल तर आवर्जून प्रयत्न करा. त्यांना त्यांच्या वयाला समजतील अशा मान्यवरांना नक्की ऐकण्याची संधी द्या. प्रदर्शनातील नवीन पुस्तकांचा तो स्वर्गीय सुवास अनुभवण्यासाठी, लहान मोठी, थोरा मोठ्यांची पुस्तके संग्रही ठेवण्याची सवय लावली गेली तर हा अनुभव कायमचा त्यांच्या स्मरणात राहील आणि मग बघा, मराठी कुठेही जाणार नाही. स्वगृही चिरंतन वास करेल आणि वृद्धिंगत होऊन अटकेपार झेंडा रोवेल यात शंकाच नाही.

\- **प्रिया गोडबोले,** एडिसन, न्यू जर्सी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## रेघ....

“आजोबांनी नाही सांगितलं ना, म्हणजे नाही. आजोबांचे सांगणे म्हणजे काळ्या दगडावरची रेघ! त्यांत बदल होणे नाही!”
मी नेहाला सांगितले खरं, पण “काळ्या दगडावरची रेघ“ म्हणजे काय, हे तिला कळले की नाही कोणास ठाऊक! ती गेली निघून , पण ही रेघ म्हणा... रेषा म्हणा... माझ्या मनांत मात्र रेंगाळत राहिली.

बिंदू बिंदू जोडून रेघ बनते आणि तिचा प्रवास अनेक क्षेत्रात सुरू होतो. तिला अनेक विशेषणे मिळाली. छोटी, मोठी, लांब, आखूड, जाड, बारीक, सरळ, तिरपी, उभी,आडवी, नागमोडी ...
अशा तिच्या अनेक तऱ्हा! अगदी मानवाच्या प्रगतीपासून किंवा पुराणात कथांपासून तिचा उल्लेख आढळतो.

काहींच्या मते लक्ष्मणानी सीतेसाठी मारली ती पहिली रेष....
गुराख्यानी गुरं चरायला नेली आणि चाळा म्हणून काठीनी मातीत उभ्या, आडव्या रेघा मारल्या...
आणि हळू हळू त्यातून चित्रांना सुरुवात झाली ......
आदिमानवांनी गुहेत ह्या रेघांतूनच कोरली त्यांची सोपी निरीक्षणं, पक्षी, प्राणी, मनुष्यकृती आणि त्यांची जीवनशैली....
वारली लोकांनी ह्या रेघांतून विकसित केली त्यांची वारली चित्र...
मुलांच्या हातात पाटी पेन्सिल आली, आणि मारली गेली उभी आडवी रेष.. सुरुवात झाली अक्षरांना.....
अक्षरांवरच्या रेघांनी पुस्तकं सजली....
सहीतल्या अक्षराखालच्या रेघांनी स्वभाव सांगितले......
त्या जोरकस रेषांमधून आत्मविश्वास दिसला..
तर पुसट, तुटक रेषांनी कमकुवतपणा सांगितला...
उभ्या आडव्या रेषांनी बनले भूमितीतले कोन....
या छोट्या मोठ्या रेषांनी मिळवले गणितात स्थान...
बेरीज, वजाबाकी, बरोबर ह्या सारख्या नावांनी त्यांनी मिळवली जगभरात मान्यता..
काही रेषांनी घेतली फिरकी आणि बनली सुंदर, कलात्मक डिझाईन्स.........
अनेक उभ्या आडव्या रेघांची झाली जाळी...
नव्या कोऱ्या गाडीवरची रेघ झाली ओरखडा....
खोल मारलेली रेघ झाली खड्डा.....
धारदार सुरीने मारलेली रेघ बनली चीर...
कपाळावरची रेघ बनली आठी....
केसातली रेघ बनली भांग...
भांगातली कुंकवाची रेघ बनली सिंदूर....
सुई धाग्याने घातलेली रेघ म्हणजे टाका
आणि रेशमानी घातलेल्या रेघा म्हणजे कशिदा.
तळपायाला थंडीत पडलेल्या रेघा म्हणजे झाली भेग...
चेहेऱ्यावरच्या रेषेने हास्य रेषा बनून आपली ओळख टिकवली
अशी रेघेने घेतली अनेक नांवं......
विमानातून पाहिले की नदीचीही दिसते एक चमकती रेघ,
एका रेघेनेच बनले उत्तर, दक्षिण गोलार्ध....
पावसात चपळ, अतिचमकदार, भयावह रेषा असते वीज....
पेयाची, द्रव पदार्थांची रेघ बनते ..धार
भोकांतून उन्हाची आलेली बारिकशी रेष .. तिरीप किंवा कवडसा....
दरवाज्याला बारिकशी रेघ..बनते फट
ह्या रेषांनी खूप अर्थ सांगितले आहेत.
मैदानातल्या चुन्याच्या रेघांनी बनवले खेळाचे नियम...
तर रस्त्यावरच्या जाड रेघांनी केली रस्ता ओलांडायला मदत...
तळहातावरच्या रेषांनी सांगितले भविष्य..
तुटक, तिरप्या रेषांनी दर्शवला पाऊस
तर आडव्या नागमोडी रेषांनी कळले पाणी किंवा लाटा...
वॉट्स ॲप वरच्या दोन रेषांनी मेसेज पोहोचल्याचा पुरावा दिला तर ECG वरच्या नाचणाऱ्या रेषांनी दिला दिलासा... आणि हॉस्पिटलमधल्या मॉनेटरवरच्या आडव्या रेषेंने जीवन संपले असल्याचा दिला इशारा ....
तर असा हा रेषेचा प्रवास!

- **चित्रा जुवेकर मेहेदळे,** सिॲटल, वॉशिंग्टन

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## अक्षरे

ख्यालीखुशाली पुसणारी ती अक्षरे
काळजातल्या शाईत बुडालेली
मनामनातले दुवे सांधणारी ती अक्षरे
आसवांच्या ठिपक्यात भिजलेली..........१

मैलोनमैल प्रवास करणारी
घटकेत सारा दुरावा संपवणारी
सणासुदीच्या आठवणीत भिजणारी
मनातल्या मजकुराने लकाकणारी.........२

सुखदुःखात साथ करणारी
मायेचा अलिखित स्पर्श कुरवाळणारी
काळजीच्या सुरांनी ओथंबणारी
आठवांचा पाढा वाचून भेटीस आसुसणारी.......३

पत्रास कारण की म्हणून थबकणारी
प्रिय म्हणून आशिर्वचने बरसवणारी
माणसाचे मन वाचू शकणारी
लांबूनही खूप जवळची वाटणारी ..........४

कागद, शाई, अश्रु आता आहेत बासनात
कळवळणाऱ्या चिन्हांची आहे बरसात
ये हृदयीचे ते हृदयी सांगणारी म्हणतात
पण ती आभासी अक्षरेच हल्ली फसवतात.......५

- **शिल्पा कुलकर्णी,** लुईव्हील, केंटकी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## रंगांची दुनिया

मी नेहमी प्रमाणे चालायाला निघाले, चालताना आजूबाजूचे निरीक्षण करत तसेच आकाशातले विलोभनीय रंग बघत त्यातले आकार शोधत. अश्या शोधकामाची चालता चालता जणू सवयच झाली होती. आकाशातल्या रंगांच्या छटा बघताना मन आपोआपच एकाग्र होते. मला वाटते की मनःशांतीसाठी वेगळे काही करायची खरं तर गरजच नाही.

रंग हा शब्दच असा आहे की शब्द उच्चारतानाच त्यांची उधळण झाल्यासारखी वाटले. मग ते आकाशातले रंग असू देत की मनातले रंग किंवा आजुबाजुच्या लोकांच्या चेहऱ्यावरचे रंग. असे सगळे रंग म्हणजे रंगातली सकारात्मकताच.



चालता चालता व्यायाम होतो तसेच निरीक्षण करणे पण वाढते. नकळतच लोकांचे रंग आणि त्यांच्या ढंगाचे निरीक्षण करायला लागतो आणि मग त्याची नंतर सवय होते. प्रत्येकाच्या सवयी, व्यक्त होण्याच्या पद्धती सगळ्याच वेगळ्या. या सगळ्यात चेहऱ्यावर येणारे रंग ते पण वेगळे अन् निराळे.

सकाळचे रंग जसे निरागस


सूर्योदयाच्या वेळचे दृश्य नेहमीच विलोभनीय असते. सूर्य जसा जसा क्षितिजावर यायला लागतो तेव्हाच्या गुलाबी छटा, त्यांची आकाशातली उधळण सगळेच प्रसन्न आणि निरागस. त्या रंगात पण सूर्याच्या प्रकाशाची ताकद दिसते.

तसे संध्याकाळचे तितकेच विराणे.



यात, संधीप्रकाश त्याची तर दुनियाच वेगळी. वेगळ्याच पातळीवरचा अनुभव. सगळीकडे सोनेरी आभा त्यात एखादा प्रखर सोनेरी किरण झाडातून डोकावतो. मनाची हुरहूर वाढवणारा, आप्तजनांची आठवण करून देणारा. दिवसाचे असे एक का अनेक रंग, त्यात स्वतःचे आणि दुसऱ्याचे पण. रंगांचे जणू तबकच.

हे रंग कोमलता दाखवतात तसेच अग्रेसरपणा पण दाखवतात. या रंगात तरलता दिसते तशीच प्रगल्भता पण दिसते. या विविधतेमुळेच रंगांचे सौंदर्य खुलते. ज्याला रंग जाणवला तोच त्याच्या प्रभावाबद्दल बोलू शकतो. निसर्गाच्या



किमयेसारखीच रंगांची दुनिया आपल्याला इतरत्र पण जाणवते, जसे की, जॅकसन पॉलक नावाचा चित्रकार, रंगांचे डबे कॅनव्हॉसवर शिंपडायचा आणि त्यातून त्याचे स्वत:चे असे भावना व्यक्त करणारे चित्र निर्माण करायचा. अगदी निसर्गासारखी रंगांची मुक्त उधळण.



फुलांचे ताटवे अगदी मैलो गणिक बघितले की वाटते काय ही निर्सगाची किमया, वाटते की निर्सगानेच रंगांची फुंकर घातली आहे. जेव्हा आपण सातारा जिल्हातल्या कास पठारावरच्या रानफुलांचे बहरणे व त्यावर रुंजी घालणारे फुलपाखरे बघितली की प्रकृतिच्या ताकदीची ओळख पटते.



तसेच इंदापूरला (महाराष्ट्र) फ्लेमिंगोचे थवे पाहिल्यावर पांढऱ्या शुभ्र चादरीवर अबोलीचा पट्टा हलका लहरत आहे असे वाटते.



त्याच बरोबर जेव्हा आपण संस्कार भारतीच्या लोकांनी काढलेल्या रांगोळ्या पाहतो तेव्हा रंगांनीच रंगांचे सौंदर्य कसे खुलते ते पण पाहतो.



होळी जो रंगांचा उत्सव, त्या बद्दल काय सांगावे. हा सण म्हणजेच रंगांची उधळण.

या शिवाय बोलायचे झाले तर, नाटकातल्या विविध भावनांना आपण नाट्यछटा म्हणतो, त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे शेक्सपिअरचे 'Venus and Adonis' काव्य. ह्यामध्ये शेक्सपिअर रंगांचा उपयोग प्रतिकात्मक रुपात करतो. लाल उत्कटता, सौंदर्याचे प्रतिक, पांढरा शुध्दता तसेच उदासिनता दर्शवते. काळा प्रेम, इच्छा याची गडद बाजू प्रतिबिंबित करते. हिरवा चैतन्याशी, निळा शांततेशी संबंधित तर जांभळा समृद्धीचे प्रतीक. अश्या विविध रंगांचा वापर Venus आणि Adonis चा भावनिक ताण तणाव रंगांच्या उधळणातून दाखवते.

नकळत तुमचा अनुभव तुम्ही बाकीच्यांच्या बरोबर बोलता आणि नकळत त्यांना पण तुमच्या रंगाच्या दुनियेत सामावून घेतात. मग ते पण स्वतःच्या रंगांची दुनिया शोधायला लागतात.

रंगांचे रंग कळूनी, जाऊ त्या रंगी दुनिया
न्याहाळू त्याला, पारखू त्याला
मनी वसवून, करू त्याला आपला

- **उत्तरा भालेराव,** टॅम्पा, फ्लोरिडा

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.


Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue. The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.




***Panchanganga Ghat, Kolhapur***
**Artist: Mangala Tata**
Dimension: 9″ x12″
Medium:Watercolor
Price : Not for sale.
Mandal: MMLA



*Jatra cha Nandi*
**Artist: Supriya Varanasi**
Dimension: 24″x 30″
Medium: Oil on canvas
Price :$400
Mandal:



*Peace in the storm*
**Artist: Charu Hirwe**
Dimensions: 16″ x 20″
Medium: Oil on canvas
Price: Not for sale.
Mandal: MMBA



***Awaiting company***
**Artist: Swaroop Ranadive**
Dimensions:9″x11″
Medium: Watercolor
Price: $149



**Artist: Chitra Juvekar - Mehendale**
Dimensions:12″ x 16″
Medium: Watercolor
Price:Not for Sale
Mandal: Seattle MM



***Peaceful Mandala***
**Artist: Priya Kulkarni - Moghe**
Dimensions:1ft x 1ft
Medium: Acrylic
Price:Not for Sale (Orders welcome)
Mandal: Arizona

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*Buyer is responsible for shipping and handling.